# कृषि पणन विषयक बातम्या : मे 2024

Agrowon Dt. 28/05/2024

# ‘आंबा, मिलेट महोत्सवा’ला अमरावतीकरांचा उदंड प्रतिसाद

## जिल्ह्यात यंदा प्रथमच महोत्सवाचे आयोजन

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

अमरावती : राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने बडनेरा रोडवरील जाधव पॅलेस येथे चार दिवसीय ‘आंबा, मिलेट महोत्सवा’चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्वांनी या महोत्सवाला भेट देऊन याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

येथील जाधव पॅलेस येथे आयोजित ‘आंबा, मिलेट महोत्सवा’चे उद्घाटन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी विभागीय आयुक्त पवार होते. सहायक आयुक्त श्यामकांत मस्के, विभागीय कृषी सहसंचालक किसन मुळे, विभागीय सह निबंधक श्रीमती देवयानी भारसवाडकर, पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक दिनेश डागा यांच्यासह कृषी व पणन विभागाचे अधिकारी कर्मचारी या वेळी उपस्थित होते. कटियार म्हणाले, की विदर्भातील वेगवेगळ्या ठिकाणी उत्पादित इतर गावरान आंबा यांना थेट ग्राहक उपलब्ध व्हावेत तसेच हापूस आंबा वाजवी दरात उपलब्ध व्हावा या उद्देशाने महोत्सवाचे प्रथमच जिल्ह्यात आयोजन करण्यात आले आहे. मिलेट्समध्ये भरपूर जीवनसत्त्वे असून त्याचे आहारातील महत्त्व याविषयी नागरिकांना माहिती होणार आहे. त्यामुळे महोत्सावाचा जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

आंबा, मिलेट्स महोत्सव हा चांगला उपक्रम असून पणन मंडळामार्फत संपूर्ण राज्यात महोत्सवाचे आयोजन होते, अशी माहिती विभागीय सहनिबंधक श्रीमती देवयानी यांनी दिली. पणन व कृषी विभागाने आपसात समन्वय ठेवून वेळोवेळी खरेदीदारांना एकत्र आणून कार्यक्रम आयोजित करावा, असे विभागीय कृषी सह संचालक श्री. मुळे यांनी या वेळी सांगितले.

आंबा व मिलेटस महोत्सवाच्या आयोजनामागील भूमिका पणन मंडळाचे उप सरव्यवस्थापक डागा यांनी विशद केली. महोत्सवाच्या माध्यमातून विदर्भातील आंब्याच्या विविध प्रजातीसंबंधी शेतकऱ्यांना ओळख होते. तसेच ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर या सारख्या मिलेट्सचे आहारातील महत्त्व आणि त्यापासून तयार होणारे विविध पदार्थ याबाबत महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांनी माहिती होते. यामुळे तृणधान्यांचा आहारातील वापर वाढतो, पर्यायाने उत्पादकांना उत्पादित माल विक्रीसाठी ग्राहक मिळतात. उत्पादन ते विक्री या साखळीतील सर्वांना आर्थिक लाभ होतो, असे पणन मंडळाचे उप सरव्यवस्थापक श्री. डागा यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मयुरी मिसाळ यांनी केले. नीलेश वानखेडे व गौरव काटकर यांनी आभार मानले.

# आंबा महोत्सवाने दिली 57 प्रजातींना ओळख

## पणनच्या महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद, दोन दिवसात तेरा लाखांची विक्री, 'केशर' ला सांगलीकरांची पसंती

प्रतिनिधी
सांगली

देवगड हापूस, रत्नागिरी हापूस, पायरी, केशर, आदी काही ठराविक नावापर्यंतच मर्यादित असणाऱ्या आंब्यांच्या ५७ प्रजातींची ओळख सांगलीकरांना झाली. निमित्त होते शुक्रवारपासून येथील कच्छी जैन भवनमध्ये राज्य कृषी पणन मंडळाने आयोजित केलेल्या आंबा महोत्सवाचे.

या आंबा महोत्सवाला सांगलीकरांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला असून दोन दिवसात सुमारे तेरा ते चौदा लाखांची विक्री झाली. महोत्सवाच्या निमिताने कृषि पणन मंडळाने सांगली जिल्ह्यात उत्पादित झालेल्या दहा प्रमुख प्रजातींना बाजारपेठ मिळवून दिलीच पण कोकणातील तब्बल ५७ प्रजातींचे आंबे नागरिकांच्या माहितीसाठी मांडले होते. दोन दिवसांत केशर आंब्याने चांगला भाव खाल्ला असून सर्वाधिक विक्री या आंब्याची झाली आहे. आज महोत्सवाचा शेवटचा दिवस आहे.

आंबा महोत्सवात कोकणातील ४७ प्रकारच्या विविध प्रजातींच्या आंब्यांची ओळख करुन देणारे विशेष दालन केले आहे. त्यामुळे कोकणातील हापूस आंब्यासह अन्य प्रजातींच्या आंब्यांनाही ओळख मिळाली आहे. शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळावी आणि ग्राहकांना नैसर्गिक पिकवलेला दर्जेदार आंबा मिळावा यासाठी राज्य कृषी पणन मंडळातर्फे राज्यभरात आंबा महोत्सवाचे आयोजन होत आहे.


सांगलीत राममंदिर चौकातील कच्छी जैन भवनमध्ये हा महोत्सव आयोजित केला आहे. कोकणात हापूस आंब्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. पण सांगली जिल्ह्यातील शेतकरीही आता द्राक्षाकडून आंबा पिकाकडे वळला आहे. सांगलीत तब्बल २८ शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या केशर आंब्याला सांगलीकरांनी दाद दिली. दराच्या पलिकडे जाऊन आंब्याच्या गुणवत्तेला दाद दिली.

महोत्सवातील सांगलीत उत्पादित होणाऱ्या दहा जातीव्यतिरिक्त आंब्याच्या ४७ प्रजाती

हापूस, करुठा कोलंबन, बैगन पल्ली, पायरी, पंचदराकलशा, फर्नांडिन, सुवर्णरेखा, मान्कुर, हिमापुद्दीन, राजूमन, वातगंगा, रत्ना, कोकण रूची, करुक्कम, काळा करेल, चेरुका रासम, विलाय कोलंबन, रान्नु-कल्लू, जहांगीर, नाजुक पसंद, कोंडूरा गौवा, तोतापुरी रेड स्मॉल, ब्लॅक कोलमन, छोटा जहांगीर, बनेशान, पूलीहारा, पदेरी, आम्लेट, कोरन, काळा गंडरस, मिराजीओ, याकुती, कुलास, माया, गोवा मानकुर केशर, ओलुर, वनराज, पेडरबाम, दुधपेढा, क्रिपींग, बंगाली पायरी, चिन्नासुवर्णरखा, मुशारद सस्ती, हिलारीओं, मोहन भोग, निलम आदी.



सांगली : प्रदर्शनात ठेवण्यात आलेले विविध प्रजातींचे आंबे.



सांगली : महोत्सवात आंब्यांची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे.

### पणनच्या उपक्रमांमुळे शेतकरी आणि ग्राहकांनाही लाभ : डॉ. घुले

कृषि आणि पणन मंडळाने सुरू केलेल्या आंबा महोत्सवामुळे कोकण आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या आंब्याला हक्काची बाजारपेठ मिळू लागली आहे. तर ग्राहकांनाही दर्जेदार किटकनाशकमुक्त आंबे मिळू लागले असल्याने दरवर्षी या महोत्सवाला प्रतिसाद वाढू लागल्याची माहिती पणनचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, यांनी दिली. हापूस वगळता अन्य प्रजातींची लागवड व्यावसायिक दृष्टीकोनातून होत नाही. त्यामुळे स्थानिक पातळीवर या प्रजातींची कमी प्रमाणात लागवड आहे. उत्पादन कमी असल्याने हा आंबा कोकणातच विक्री केला जात आहे. पण आता कोकणाव्यतिरिक्त अन्य भागातील शेतकरीही आंबा लागवडीकडे वळू लागला असल्याची माहितीही डॉ. घुले यांनी दिली.

Pudhari Dt. 26/05/2024

# पणनबाबत महाराष्ट्र, नागालँडमध्ये लवकरच सामंजस्य करार

## महाराष्ट्रातील शेतमाल पणनची क्रांती दिशादर्शक

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कृषी उत्पन्नाच्या पणनच्या कामात महाराष्ट्राने केलेली प्रगती इतरांना दिशादर्शक अशीच आहे. त्यामध्ये शेतमाल निर्यात सुविधा केंद्रे, मालाची प्रतवारी आणि वर्गीकरणाचे काम (ग्रेडिंग-सॉर्टिंग), पणनचे प्रशिक्षण, विविध महत्त्वपूर्ण योजनांची अंमलबजावणी चांगली असून, याबाबत आम्ही महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळासमवेत लवकरच सामंजस्य करार करणार असल्याची माहिती नागालँड पणन मंडळाच्या शिष्टमंडळाने पुणे भेटीत दिली.



नागालँड कृषी पणन मंडळाचे उपकार्यकारी संचालक बेनरिथुंग मोजुई यांचा सत्कार करताना विनायक कोकरे (उजवीकडे) व अन्य अधिकारी.

नागालँड कृषी पणन मंडळाचे चालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी एन. जोकोब यंथन, उप कार्यकारी संचालक बेनरिथुंग मोजुई व या राज्याचे ई-नामचे राज्य समन्वयक वेयोझो डी वदेओ यांनी राज्य कृषी पणन मंडळाच्या मार्केट यार्डातील मुख्यालयास नुकतीच भेट दिली. या वेळी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी शिष्टमंडळाचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करीत मंडळाच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली.

शिष्टमंडळाच्या भेटीमध्ये महाराष्ट्रात उत्पादित होत असलेला कृषीमाल, त्याची निर्यात, प्रक्रिया, विविध कृषी पणनविषयक प्रशिक्षण, इतर राज्यांत मार्केटिंग व निर्यात करण्याबाबत पणन मंडळाने केलेल्या कामाची माहिती घेऊन त्यांनी प्रशंसा केली. या कामांची त्याप्रमाणे नागालॅण्डमध्ये अंमलबजावणी करता येईल काय ? याबाबत माहिती घेण्यासाठी भेटीचे आयोजन केल्याचे एन जोकोब यंथन यांनी या वेळी सांगितले.

कोकरे यांनी कृषी पणन मंडळाने कृषी पणनविषयक केलेल्या कामकाजाची, निर्यात सुविधा केंद्रांची, पणनविषय प्रशिक्षणाची, विविध योजनांतर्गत उभारलेल्या सुविधांची, कृषी पणन मंडळाच्या योजना, उपक्रम व कार्याबाबतची माहिती दिली. तसेच बाजार समित्यांचे कामकाज व त्यांनी उभारलेल्या सोई-सुविधांबद्दल माहिती देऊन महाराष्ट्रातील बाजार समिती भेटीचे नियोजन करून दिले.

### तळेगाव, बारामती बाजार समितीस दिली भेट

नागालॅण्ड कृषी पणन मंडळामार्फत आलेल्या अधिकारीवर्गाने या दौऱ्यावेळी तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेतील आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण संस्था व परिसरात भेट देऊन माहिती घेतली. तसेच त्यांनी बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने उभारलेल्या विविध प्रकल्पांना भेट दिल्या. त्यामध्ये फळे व भाजीपाला सुविधा केंद्र, आंबा ग्रेडिंग व प्रोसेसिंग केंद्र, धान्य ग्रेडिंग व सॉर्टिंग केंद्र, जनावरांचा अद्ययावत बाजार, गांडूळ खते प्रकल्प, रेशीम कोष प्रकल्प, ई-नाम कार्यप्रणाली इत्यादींची सविस्तर माहिती घेतल्याचे सांगण्यात आले.

Pudhari, Dt. 26/05/2024



सांगली : प्रदर्शनातील आंब्याची पाहणी करताना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी. शेजारी डॉ. सुभाष घुले, विवेक कुंभार आदी.

# सांगलीत आंबा महोत्सवास प्रारंभ

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

कृषी विभाग सांगली व कृषी पणन मंडळामार्फत शुक्रवार, दि. २४ ते रविवार, दि. २६ मेपर्यंत 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेतंर्गत 'सांगली आंबा महोत्सव २०२४'चे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्याहस्ते करण्यात आले. या महोत्सवात ३५ शेतकऱ्यांनी ४७ प्रकारच्या विविध जातीचे आंबे प्रदर्शनात ठेवले आहेत.

हा आंबा महोत्सव येथील राम मंदिर चौकातील कच्छी जैन भवन येथे येथे सकाळी आठ ते रात्री आठ वाजेपर्यंत आयोजित केला आहे. यावेळी कृषी पणन मंडळ कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवशे आदी उपस्थित होते.

## विविध प्रजातींचे आंबे...

या प्रदर्शनात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर व सांगली जिल्ह्यातील ४७ प्रकारचे आंबे ठेवले आहेत. रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, स्थानिक केशर आंबा याबरोबरच राजूमन, करुठा कोलंबन, हिमायुद्दीन, सुवणरिखा, ब्लॅक कोलमन, तोतापुरी, कोंडूर गोवा, नाजुद पसंद, सन्नू-कल्लू, बिलाय कोलंबन, बनेशान, केसर, जहांगीर, काळा गंडरस आदी जातीचे आंबे प्रदर्शनात आहेत.

# आंबा व मिलेट महोत्सवाचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**अमरावती :** राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने आंबा व मिलेट महोत्सव प्रदर्शनी व विक्रीचे आयोजन जाधव पॅलेस येथे करण्यात आले. या महोत्सवामध्ये आंब्याच्या विविध प्रजाती तसेच मिलेटचे विविध प्रकार प्रदर्शनीत ठेवण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या महोत्सवाला नागरिकांचा प्रतिसाद मिळत असून नैसर्गिक पद्धतीने पिकवलेला आंबा व मिलेट्स पदार्थांचे नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आंबा उत्पादनासाठी वाव मिळावा आणि आंबा प्रेमींना विविध प्रजातींच्या आंब्याची चव चाखता यावी. तसेच तृणधान्यांमध्ये असलेले पोषक घटक आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर असून त्यांचा लाभ ग्राहकांना मिळावा यासाठी जाधव पॅलेस येथे रविवार २६ मेपर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत आंबा व मिलेट महोत्सव प्रदर्शनी व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात कोकणचा अस्सल हापूस आंबा, केशर आंबा, मिलेट ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई,राळा, भगर इत्यादी धान्य आणि त्यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बिस्कीट इत्यादी नाविन्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून खरेदीची संधी ग्राहकांना मिळाली आहे, अशी माहिती पणन मंडळ उपसरव्यवस्थापक दिनेश डागा यांनी दिली. आंबा व मिलेट्स महोत्सवाच्या उद्घाटनाला विभागीय आयुक्त संजय पवार, उपायुक्त म्हस्के, विभागीय सहसंचालक किसन मुळे, विभागीय सह निबंधक देवयानी भारसवाडकर, पणन मंडळ उपसरव्यवस्थापक दिनेश डागा आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालक मयुरी मिसाळ व निलेश वानखडे यांनी तर आभार प्रदर्शन गौरव काटकर यांनी केले.

Lokmat Dt. 25/05/2024

# सांगलीकरांनी मारला हापूस, केशरवर ताव

## आंबा महोत्सव रविवारपर्यंत सुरू : रत्नागिरी, देवगड व केशर आंबा उत्पादकांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** सांगलीकरांनी म्हणजेच शहर आणि परिसरातील भागातील नागरिकांनी महोत्सवातील शेकडो डझन आंबे फस्त केले आहेत. राज्यांमधून १५ प्रमुख प्रकारचे आंबे महोत्सवामध्ये विक्रीला आले आहेत. ग्राहकांची सर्वाधिक पसंती कोकणच्या हापूसला मिळत आहे. रत्नागिरी, देवगड हापूससह स्थानिक केशर आंबाही महोत्सवात मोठ्या प्रमाणात शेतकरी घेऊन आले आहेत. दरम्यान, सांयकाळी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी महोत्सवास भेट देऊन पाहणी केली.

कृषी विभाग व कृषी पणन मंडळामार्फत दि. २४ ते २६ मे २०२४ या कालावधीत उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेंतर्गत 'आंबा महोत्सवा'चे कच्छी जैन भवन, सांगली येथे आयोजन केले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, कृषी पणन मंडळ कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झाले.

यावेळी जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ, पणनचे अधिकारी ओंकार माने, सत्यजित भोसले, प्रतीक गोनुगडे, सुयोग टकले, संदेश पिसे आदी उपस्थित होते.



सांगलीतील आंबा महोत्सवाची जिल्हाधिकारी राजा दयानिधी यांनी पाहणी केली.

डॉ. सुभाष घुले म्हणाले, विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळण्यासाठी हा आंबा महोत्सव आयोजित केला आहे. महोत्सवामध्ये रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, स्थानिक केशर आंबा उत्पादक व इतर विविध जातींचे आंबा उत्पादक शेतकरी सहभागी झाले आहेत. शेतकऱ्यांना स्टॉल उपलब्ध केले आहेत. ग्राहकांना हापूस व स्थानिक केशर आंबा उत्पादकांकडून विक्रीसाठी उपलब्ध आहे. पहिल्याच दिवशी शेकडो डझन आंब्यांची विक्री झाली आहे.

Lalkar Vrutta Dt. 25/05/2024



# आंबा महोत्सवास जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांची भेट

। ललकार वृत्त ।

सांगली दि. २४ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य कृषि विभाग सांगली वं कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक भेट विक्री या संकल्पनेअंतर्गत 'सांगली आंबा महोत्सव २०२४'चे आयोजन करण्यात आले असून जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी आज या आंबा महोत्सवास भेट देऊन पाहणी केली.

यावेळी कृषि पणन मंडळ कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी विवेक कुंभार,. जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ, कृषी उपसंचालक श्री. पाटील व आंबा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

२४ ते २६ मे २०२४ या कालावधीत कच्छी जैन भवन, राम मंदिर चौक, सांगली येथे हा आंबा महोत्सव होत आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, स्थानिक केशर आंबा व इतर विविध जातीचे आंबा उत्पादक शेतकरी सहभागी झाले आहेत. या महोत्सवाचा लाभ सांगलीकरांनी घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

Kesari Dt. 25/05/2024

# आंबा महोत्सवास जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांची भेट

## राज्य कृषि व पणन मंडळामार्फत रविवारपर्यंत आंबा महोत्सवाचे

केसरी वृत्तसेवा

सांगली : महाराष्ट्र राज्य कृषि विभाग सांगली व कृषि पणन मंडळामार्फत आयोजित उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेअंतर्गत 'सांगली आंबा महोत्सव २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी आज या आंबा महोत्सवास भेट देऊन पाहणी केली.

जिल्ह्यात पणन मंडळाकडून आंबा महोत्सव हा उपक्रम आयोजित करत आहेत, ही बाब चांगली आहे. त्यामुळे सांगलीतील ग्राहकांना खात्रीशीर आणि दर्जेदार केशर आणि हापूस आंबा उपलब्ध होत. उत्पादक ते थेट ग्राहक विक्री ही संकल्पना चांगली आहे. त्यामुळे विक्री व्यवस्थेची साखळी भक्कम होण्यास मदत होत आहे असे मत जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी व्यक्त केले.

सांगली येथील कच्छी भवन येथे शुक्रवार (ता. २४) कृषी विभाग व कृषी पणन मंडाळामार्फत आयोजित केलेल्या उत्पादक ते ग्राहक या संकल्पनेतून आंबा महोत्सव उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कृषी पणन मंडळ कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ, मिरज तालुका कृषी अधिकारी मिलींद निंबाळकर, रमाकांत भजनावळे, सांगली जिल्हा पणन अधिकारी ओंकार माने, कोल्हापूर जिल्हा पणन अधिकारी प्रतिक गोनुगडे, सत्यजित भोसले, संदेश पिसे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य कृषि विभाग सांगली व कृषि पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवात आंब्याची पाहणी करताना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी.

कृषि पणन मंडळ कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी विवेक कुंभार, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ, कृषी उपसंचालक श्री. पाटील व आंबा उत्पादक शेतकरी उपस्थित होते. २४ ते २६ मे २०२४ या कालावधीत कच्छी जैन भवन, राम मंदिर चौक, सांगली येथे हा आंबा महोत्सव होत आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, स्थानिक केशर आंबा व इतर विविध जातीचे आंबा उत्पादक शेतकरी सहभागी झाले आहेत. या महोत्सवाचा लाभ सांगलीकरांनी घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

सांगली, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधूदुर्ग या पाच जिल्ह्यातील १९ शेतकरी आंबा महोत्सवात सहभाग घेतला आहे. सुमारे ८०० ते १००० डझन आंबा विक्रीस उपलब्ध असून २५० ते ५०० रुपये प्रति डझन असे दर आहेत. आंबा महोत्सवात वनराज, दूधपेठा, माया, छोटा जहांगीर, गोवा मानकुरा, चेरुका, काळा गंडरस, पदेरी, यासह ४७ जातीचे आंबे प्रदर्शनात आहेत.

Date 25/05/2024

# आंबा, मिलेट महोत्सवाचा लाभ घ्या

## जिल्हाधिकारी सौरभ कटियार : अमरावतीकरांचा उदंड प्रतिसाद

**अमरावती,** ब्युरो. राज्य कृषी पणन मंडळातर्फे बडनेरा रोडवरील जाधव पॅलेस येथे चार दिवसीय 'आंबा व मिलेट महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून अमरावतीकरांना नैसर्गिक पध्दतीने पिकविलेल्या विविध प्रजातीच्या आंब्यांचा गोडवा चाखायला मिळणार आहे. तसेच तृणधान्यांपासून तयार होणाऱ्या (मिलेटस) पदार्थांची ओळख व त्याचे आहारातील महत्त्व याबाबत माहिती होईल. त्यासाठी जिल्ह्यातील सर्वांनी या महोत्सवाला भेट देऊन याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी गुरुवारी (दि. 24) केले. येथील जाधव पॅलेस येथे आयोजित आंबा मिलेट धान्य महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कटियार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी विभागीय आयुक्त संजय पवार होते. सहायक आयुक्त श्यामकांत मस्के, विभागीय कृषी सहसंचालक किसन मुळे, विभागीयसह निबंधक श्रीमती देवयानी भारसवाडकर, पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक दिनेश डागा यांच्यासह कृषी व पणन विभागाचे अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कटियार म्हणाले




की, विदर्भातील वेगवेगळ्या ठिकाणी उत्पादित इतर गावरान आंब्याला थेट ग्राहक उपलब्ध व्हावेत तसेच हापूस आंबा वाजवी दरात उपलब्ध व्हावा या उद्देशाने महोत्सवाचे प्रथमच जिल्ह्यात आयोजन करण्यात आले आहे. तसेच ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर यासारख्या मिलेट्सपासून तयार होणारी उत्पादने व कृषी माल उत्पादने यासाठी थेट ग्राहक उपलब्ध व्हावेत, हाही उद्देशाने यातून साध्य होणार आहे. मिलेटस् भरपूर जीवनसत्वे असून त्याचे आहारातील महत्त्व याविषयी नागरिकांना माहिती होणार आहे. त्यामुळे महोत्सावाचा जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

पणन मंडळामार्फत असा महोत्सव वेळोवेळी घेण्यात यावा तसेच आंबा पिकाचे उत्पादन व विपणनासाठी उत्पादक व ग्राहक या दोघांमध्ये समन्वय घडवून आणावा, अशा सूचना प्रभारी विभागीय आयुक्त संजय पवार यांनी केली. आंबा व मिलेट्स महोत्सव हा चांगला उपक्रम असून पणन मंडळामार्फत संपूर्ण राज्यात महोत्सवाचे आयोजन होते, अशी माहिती विभागीय सहनिबंधक श्रीमती देवयानी यांनी दिली. पणन व कृषी विभागाने आपसात समन्वय ठेवून वेळोवेळी खरीददारांना एकत्र आणून कार्यक्रम आयोजित करावा, असे विभागीय कृषी सहसंचालक श्री. मुळे यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन मयुरी मिसाळ तर नीलेश वानखडे व गौरव काटकर यांनी आभार मानले.

### उत्पादन ते विक्री या साखळीतील सर्वांना आर्थिक लाभ

आंबा व मिलेट्स महोत्सवाच्या आयोजनामागील भूमिका याबाबत पणन मंडळाचे उप सरव्यवस्थापक डागा विशद केली. महोत्सवाच्या माध्यमातून विदर्भातील आंब्याच्या विविध प्रजातीसंबंधी शेतकऱ्यांना ओळख होते. तसेच ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर यासारख्या मिलेट्सचे आहारातील महत्त्व आणि त्यापासून तयार होणारे विविध पदार्थ याबाबत महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांनी माहिती होते. यामुळे तृणधान्यांचा आहारातील वापर वाढतो, पर्यायाने उत्पादकांना उत्पादीत माल विक्रीसाठी ग्राहक मिळतात. उत्पादन ते विक्री या साखळीतील सर्वांना आर्थिक लाभ होतो, असे पणन मंडळाचे उप सरव्यवस्थापक डागा यांनी आपल्या भाषणात सांगितले.

Date 25/05/2024



सांगली : आंबा महोत्सवात पाहणी करताना जिल्हाधिकारी.

# सांगलीत आंबा महोत्सवास प्रारंभ

**सांगली / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी विभाग सांगली व कृषी पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेअंतर्गत सांगली आंबा महोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले असून जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी या आंबा महोत्सवास भेट देऊन पाहणी केली.

यावेळी कृषी पणन मंडळ कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ, कृषी उपसंचालक पाटील व आंबा उत्पादक शेतकरी उपस्थित होते. २४ ते २६ मे या कालावधीत कच्छी जैन भवन, राम मंदिर चौक, सांगली येथे हा आंबा महोत्सव होत आहे.

या महोत्सवामध्ये रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, स्थानिक केशर आंबा व इतर विविध जातीचे आंबा उत्पादक शेतकरी सहभागी झाले आहेत. या महोत्सवाचा लाभ सांगलीकरांनी घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

Date 25/05/2024



# आंबा महोत्सव सुरू

प्रतिनिधी
सांगली

महाराष्ट्र राज्य कृषि विभाग सांगली व कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेअंतर्गत 'सांगली आंबा महोत्सव २०२४' चे आयोजन करण्यात आले असून जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी आज या आंबा महोत्सवास भेट देऊन पाहणी केली.

यावेळी कृषि पणन मंडळ कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी विवेक कुंभार, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ, कृषी उपसंचालक पाटील व आंबा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

२४ ते २६ मे २०२४ या कालावधीत कच्छी जैन भवन, राम मंदिर चौक, सांगली येथे हा आंबा महोत्सव होत आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, स्थानिक केशर आंबा व इतर विविध जातीचे आंबा उत्पादक शेतकरी सहभागी झाले आहेत. विविध जातींचे आंबे एकाच ठिकाणी पाहण्याची आणि खरेदी करण्याची सोय या प्रदर्शनामुळे मिळाली आहे. या महोत्सवाचा लाभ सांगलीकरांनी घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.



सांगली : कोकणातील आंब्यांची माहिती घेताना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी.

# पहिल्याच दिवशी आंबा शौकिनांची उसळली गर्दी



**छत्रपती संभाजीनगर :** विविध ठिकाणाहून आंबा महोत्सात सहभागी होण्यासाठी आलेल्या स्टॉलधारक शेतकऱ्यांची बाजार समिती व पणन विभागाच्या वतीने निवास आणि भोजनाची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. आंबा महोत्सवात पहिल्याच दिवशी ७७५ टन केशर आणि हापूस आंब्याची विक्री झाली.

मराठवाड्यासह रत्नागिरी येथूनही केशर आणि हापूस विक्रीसाठी उपलब्ध आहे. पहिल्याच दिवशी २५ डजन रत्नागिरी हापूसची विक्री झाली. अडीच डझनची एक पेटी बाराशे ते तेराशे रुपयांना आहे. पिसादेवी येथील अशाक निकम यांनी दुपारपर्यंत ३५ किला केशर विक्री झाल्याचे सांगितले. पैठण तालुक्यातील ७४ जळगाव येथील हमदर्द लॅबचे कृषी व्यवस्थापक इर्शाद अहेमद खान यांनी नैसर्गिकरित्या पिकवलेला दीड टन आंबा हातोहात गेला. घनसावंगी तालुक्यातील मांदळा येथील विलास वाव्हळ म्हणाले महोत्सवात पहिल्याच दिवशी चांगला प्रतिसाद मिळाला. फ्रूटकर्माचे जाकेर शेख व विलास वाव्हळ यांनी देखील आंबा महोत्सवातून ग्राहकांना नैसर्गिकरित्या पिकवलेला आंबा खावू घालण्यात आनंद मिळत असल्याचे सांगितले. देवनांद्रा (ता. पाथ्री) येथील अरुणा भुजंग थोरे यांनी रात्री उशिरापर्यंत दीडशे किला केशर विकला गेल्याचे सांगितले. पैठण तालुक्यातील लाखेगावच्या नागेश वासुंदेकर यांनी देखील ६०० किलो आणलेला आंबा विक्री झाल्याचे सांगितले. गंगाजल कृषी फार्मचे सुशील बलदवा आणि हाफीज खान यांनी ५० पेट्यांची विक्री झाल्याचे सांगितले.

लक्ष्मीकांत पांडे आणि संदीप पाटील यांनी देखील महोत्सवातून अस्सल आणि नैसर्गिक पद्धतीने केशर आंबा ग्राहकांना देण्याची मोठी संधी आम्हाला मिळाल्याचे सांगितले. साजापूर येथील उन्मेश ओमप्रकाश शिंदे यांनी सायंकाळपर्यंत ५० पेट्या केशर विकल्याचे सांगितले. घोडवली ता. संगमश्वर येथील अमित बने यांच्याकडेही ५०० ते १००० रु. डझन रत्नागिरी हापूस विक्रीस चोखंदळ ग्राहकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले.

## ‘केशर’ला जागतिक बाजारपेठ मिळवून देणार

### संजय कदम यांचे आश्वासन : आंबा महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**छत्रपती संभाजीनगर :** फळाचा राजा आंब्याला स्थानिक ते आंतरराष्ट्रीय पातळीवर मागणी आहे. गुजरातचा आंबा निर्यातीत पुढे आहे. त्याच धर्तीवर मराठवाड्यातील केशर आंब्याला जागतिकस्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात आहे, अशी माहिती कृषी व पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. २६ मे पर्यंत महोत्सव सुरू राहणार आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती, कृषी पणन मंडळ, महाकेशर आंबा बागायतदार संघ आणि मँगो ग्रोअर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमान जाधवाडी-पिसादेवी रोडवर गुरुवारपासून ४ दिवस आंबा महोत्सवात कदम बोलत होते. आ. हरिभाऊ बागडे व कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. सभापती राधाकिशन पठाडे, संचालक गणेश दहिहंडे, जगन्नात काळे, जिल्हा उपनिबंधक डॉ. मुकेश बारहाते, उपसरव्यवस्थापक गजानन वाघ, देविदास पालोदकर, उदय देवळाणकर, नंदू काळे, सुशिल बलदवा, जी. सी. वाघ, पतंगे, दहे आदी उपस्थित होते. महोत्सवात हापूस आंब्याचे ७ स्टॉल, केशर आंबाचे १५ स्टॉल लागले असून, १६ स्टॉलसह भरडधान्य-तृणधान्यासह बचतगटांच्या एकूण ३८ उत्पादक सहभागी झाले आहेत.आदी उपस्थित होते.

कदम म्हणाले की, आंबा महोत्सव शेतकरी व ग्राहक थेट खरेदी विक्री करतात. त्यामुळे मधली लूट थांबते. गुणवत्तापूर्ण व दर्जेदार आंबा मिळतो. त्यामुळे राज्यभरात कृषी उत्पन्न बाजार समितीत आंबा महोत्सव भरवला जातो. मात्र, निर्यातीत गुजरातचा केशर पुढे आहे. त्याच्या पुढे मराठवाडा केशर गेला पाहिजे. यावर आपल्याला सर्वांनाच काम करावे लागणार आहे.



आंबा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी आ. हरिभाऊ बागडे, संजय कदम, राधाकिसन पठाडे आदी.

Lokmat, Dt. 24/05/2024

# पहिल्याच दिवशी विकला ३१०० किलो आंबा

## जाधववाडी महोत्सव : रत्नागिरीच्या हापूसपेक्षा मराठवाडी केशरला खवय्यांची पसंती

लोकमत न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर : रत्नागिरीचा हापूस व मराठवाड्यातील केशर आंबा खरेदीसाठी जाधववाडीतील उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संकुलात ग्राहकांची गर्दी झाली होती. अस्सल चव चाखण्यासाठी उन्हाची पर्वा न करता ग्राहक आंबा महोत्सवात आले होते. दिवसभरात ७४८ हापूस व २३६० किलो केशर आंबे विक्री झाले. रत्नागिरीच्या हापूसपेक्षा मराठवाडी केशर खरेदीला खवय्यांनी पसंती दिली.

कृषी उत्पन्न बाजार समिती, महाकेशर आंबा बागायतदार संघ, मँगो ग्रोअर्स असोसिएशन व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जाधववाडीतील पिसादेवी रोडवरील कृउबाच्या व्यावसायिक



जाधववाडीतील उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आयोजित आंबा व मिलेट महोत्सवात आंब्याचा सुगंध घेताना ग्राहक.

इमारतीसमोर महोत्सव भरविण्यात आला आहे. चारदिवसीय आंबा व मिलेट महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या हस्ते झाले. यावेळी आ. हरिभाऊ बागडे, कृषितज्ज्ञ डॉ. भगवानराव कापसे, सभापती राधाकिसन पठाडे, उपसभापती मुरलीधर चौधरी, कृषी पणन मंडळाचे सल्लागार डी. एम. पालोदकर, उदय देवळाणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या महोत्सवासाठी रत्नागिरीतील हापूसचे ६ स्टॉल, तर मराठवाड्यातील विविध भागातील केशर आंब्याचे ११ स्टॉल लावण्यात आले आहे. हापूस आंबा ४०० ते ५०० रुपये डझन, तर केशर आंबा १२० ते १५० रुपये किलोने विकत आहे. विशेष म्हणजे केशर आंब्याच्या स्टॉलवर ग्राहकांची जास्त गर्दी दिसून आली. कारण, मार्च महिन्यापासून शहरवासी हापूसची गोडी चाखत आहेत आणि आता मराठवाड्यातील केशर आंबा बाजारात येऊ लागला आहे. यामुळे ग्राहकांचा ओढा केशर खरेदीकडे जास्त होता.

Date 24/05/2024

लोकसभा निवडणूक २०२४
दिव्य मराठी
छत्रपती संभाजीनगर • एव

**आंबा महोत्सव** • जाधववाडी-पिसादेवी रोडवरील समितीच्या जागेवर २६ मेपर्यंत असेल सुरू

# उद्घाटनापूर्वीच ६०० किलो आंब्याची विक्री; मराठवाड्याचा केशर सातासमुद्रापलीकडे पोहोचवणार : पणन संचालक संजय कदम

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर



फळांचा राजा आंब्याला स्थानिक ते आंतरराष्ट्रीय पातळीवर मागणी आहे. गुजरातचा आंबा निर्यातीत पुढे आहे. त्याच धर्तीवर मराठवाड्यातील केशर आंब्याला जागतिक स्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात आहे, अशी माहिती कृषी व पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. आंबा महोत्सवात ते बोलत होते. उद्घाटनापूर्वी ६०० किलो आंबा ग्राहकांनी खरेदी केला.

कृषी उत्पन्न बाजार समिती, कृषी पणन मंडळ, महाकेशर आंबा बागायतदार संघ आणि मँगो ग्रोअर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जाधववाडी-पिसादेवी रोडवरील समितीच्या जागेवर २३ ते २६ मेदरम्यान चार दिवस आंबा व मिलेट्स (भरडधान्य व तृणधान्य) महोत्सवाचे आयोजन केले आहे. उद्घाटन गुरुवारी सकाळी ११ वाजता आमदार हरिभाऊ बागडे व कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संचालक गणेश दहिहंडे, जगन्नाथ काळे, डॉ. भगवान कापसे, डॉ. मुकेश बारहाते, उपसरव्यवस्थापक गजानन वाघ उपस्थित होते. आंबा महोत्सवाला सकाळी सात वाजेपासून सुरुवात झाली होती.

कदम पुढे म्हणाले की, निर्यातीत गुजरातचा केशर पुढे आहे. त्याच्या पुढे मराठवाडा केशर गेला पाहिजे. यावर आपल्याला सर्वांनाच काम करावे लागणार आहे. त्या गुणवत्तेचे आंबा उत्पादन झाले तर जागतिक स्तरावर बाजारपेठा उपलब्ध आहेत. शासन निर्यातीसाठी मदत करते. त्याचा फायदा तुम्हाला घेता येईल.

## ५० एकर जागा परत करा : आमदार हरिभाऊ बागडे

पणन मंडळाने बाजार समितीची ५० एकर जागा घेतली आहे. त्यावर ते स्वतः काही विकास करत नाहीत. त्यामुळे ही जागा परत करावी, अशी मागणी आमदार हरिभाऊ बागडे यांनी केली. या जागेवर आम्ही विकास करून दाखवू, अशी ग्वाही बागडे यांनी दिली. त्यांच्या विधानाचा विरोधी पक्षाचे संचालक जगन्नाथ काळे यांनी चांगलाच समाचार घेत, यांना जागा विकासासाठी नव्हे तर विक्रीसाठी पाहिजे असेल. जळगाव रोडवरील जागेवर विकास करण्याऐवजी ती बिल्डराच्या घशात घालण्याचा प्रयत्न सुरू केल्याचेही ते म्हणाले.

Agrowon Dt. 24/05/2024

# केसर आंब्याला प्लॅटफॉर्म मिळवून देणार

## 'पणन'चे संचालक संजय कदम : आंबा व मिलेट महोत्सवाला सुरुवात

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

छत्रपती संभाजीनगर : कोकणातल्या हापूस प्रमाणेच मराठवाडा व महाराष्ट्रातील केसर आंब्याला देश आणि जागतिक स्तरावर प्लॅटफॉर्म मिळवून देण्यासाठी पणन मंडळाचे प्रयत्न सुरू, असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे संचालक संजय कदम यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुरुवारी (ता २३) आंबा व मिलेट महोत्सवाचे उद्घाटन विधानसभेचे माजी अध्यक्ष व आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. कदम बोलत होते. या कार्यक्रमाला बाजार समितीचे सभापती राधाकिसन पठाडे, उपसभापती मुरलीधर चौधरी यांच्यासह संचालक, श्रीराम शेळके, जगन्नाथ काळे व इतर संचालक, जिल्हा उपनिबंधक डॉ. मुकेश बारहाते, पणनचे विभागीय उपसरव्यवस्थापक जे. सी. वाघ, पणन मंडळाचे सल्लागार देविदास पालोदकर, महाकेसर आंबा बागायतदार संघाचे अध्यक्ष नंदलाल काळे, तज्ज्ञ संचालक उपाध्यक्ष डॉ. भगवानराव कापसे, महापालिकेच्या नगररचना विभागाचे विश्वनाथ दहे, दामूअण्णा नवपुते आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्रास्ताविक बाजार समितीचे सभापती श्री. पठाडे यांनी केले. श्री. कदम म्हणाले, की पुण्यात भरणारा आंबा महोत्सव प्रत्येक विभाग स्तरावर घेण्याची भूमिका पणनमंत्र्यांनी घेतली. त्याला अनुसरून राज्यात विविध ठिकाणी आत्ताच्या घडीला आंबा महोत्सव सुरू आहेत. अलीकडेच नागपुरात केसर, हापूस आंबा महोत्सवाच्या माध्यमातून विक्रीसाठी ठेवला. जवळपास ४० लाखांचा हापूस आंबा त्या महोत्सवातून विकला गेला. पुढच्या वर्षी नियोजनपूर्वक गट तयार करून आंबा फुलोऱ्यात असल्यापासूनच महोत्सव नेमका कधी घ्यायचा याविषयी नियोजन केले जाईल. पणन मंडळाने जवळपास २० वर्षांपासून हापूसला निर्यातीत स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. तसेच प्रयत्न यापुढे मराठवाड्याच्या, महाराष्ट्राच्या केसरला स्थान मिळवून देण्यासाठी केले जातील. याशिवाय महोत्सवात सहभागी होणाऱ्या आंबा उत्पादकांना क्रेट देण्यावरही विचार सुरू आहे. अध्यक्षीय समारोप करताना श्री. बागडे म्हणाले, की आंबा उत्पादकांनी आपल्या पिकाकडे व्यवसाय म्हणून पहावे. त्यानुसारच बागांची निगा राखावी. उत्पादनाबरोबर दर्जा सांभाळावा व ग्रेडिंग करूनच आंब्याची विक्री करावी. आभार संचालक श्रीराम शेळके यांनी मानले. आंबा महोत्सवात सुरुवातीला जवळपास १४ ते १५ हापूस व केसर आंबा उत्पादक सहभागी झाले. याशिवाय प्रक्रियायुक्त मिलेट पदार्थ ही विक्रीसाठी काही स्टॉलमधून उपलब्ध करून देण्यात आले होते. हापूसची ४०० ते ७०० रुपयांपर्यंत प्रति डझनाने विक्री सुरू होती. तर केसर आंबा १०० ते १७० रुपये प्रति किलो दरम्यान विकण्याची तयारी शेतकऱ्यांनी केली होती.



**छत्रपती संभाजीनगर : आंबा मिलेट महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे संचालक संजय कदम. या वेळी मंचावर उपस्थित आमदार हरिभाऊ बागडे व इतर.**

Sakal Dt. 24/05/2024

# केसरला प्लॅटफॉर्म मिळवून देणार

## संजय कदम : आंबा महोत्सवाचे उद्‌घाटन

■ सकाळ वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर, ता. २३ : "कोकणातल्या हापूस प्रमाणेच मराठवाडा व महाराष्ट्रातील केसर आंब्याला देश आणि जागतिक स्तरावर प्लॅटफॉर्म मिळवून देण्यासाठी पणन मंडळाचे प्रयत्न सुरू आहेत", अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे संचालक संजय कदम यांनी दिली.

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुरुवारी (ता. २३) आंबा व मिलेट महोत्सवाचे उद्‌घाटन आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कदम बोलत होते. बाजार समितीचे सभापती राधाकिसन पठाडे, उपसभापती मुरलीधर चौधरी, संचालक श्रीराम शेळके, जगन्नाथ काळे, जिल्हा उपनिबंधक डॉ. मुकेश बारहाते, पणनचे विभागीय उपसरव्यवस्थापक जे. सी. वाघ, पणन मंडळाचे सल्लागार देविदास पालोदकर, महाकेसर आंबा बागायतदार संघाचे अध्यक्ष नंदलाल काळे, डॉ. भगवानराव कापसे, महापालिकेच्या नगररचना विभागाचे विश्वनाथ दहे, दामूअण्णा नवपुते आदींची उपस्थिती होती. महोत्सवात सुरुवातीला जवळपास १५ हापूस व केशर आंबा उत्पादक सहभागी झाले. याशिवाय प्रक्रियायुक्त मिलिट पदार्थ ही विक्रीसाठी काही स्टॉल मधून उपलब्ध करून देण्यात आले होते. हूपुसची ४०० ते ७०० रुपयांपर्यंत प्रति डझनने विक्री सुरू होती.

Sakal Dt. 22/05/2024

# ‘उत्पादक ते ग्राहक’ संकल्पनेतून बाजार समितीत ‘आंबा उत्सव’

## शहरातील खवय्यांना चार दिवस खरेदीची संधी

■ सकाळ वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर, ता. २१ : कृषी उत्पन्न बाजार समिती येथे ‘उत्पादक ते ग्राहक’ या अभिनव संकल्पनेतून चारदिवसीय आंबा व मिलेट महोत्सवाला गुरुवारपासून (ता. २३) सुरवात होणार आहे. महोत्सवात राज्यभरातील शेतकरी सहभागी होणार आहेत. यात हापूस, केशर आंबा आणि कृषिपूरक उत्पादने खरेदी करता येतील, अशी माहिती समितीचे सभापती राधाकिसन पठाडे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी पणन मंडळाचे गजानन वाघ, बाजार समितीचे सचिव विजय शिरसाट, डी. एम. पालोदकर आणि पतंगे उपस्थित होते.

कृषी उत्पन्न बाजार समिती छत्रपती संभाजीनगर, महाकेशर आंबा बागायतदार संघ, मँगो ग्रोअर्स असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या वतीने हा महोत्सव होत आहे. समितीच्या आवारात २३ ते २६ मे या कालावधीत सकाळी नऊ ते रात्री नऊ या वेळेत महोत्सव खुला असणार आहे. या महोत्सवात आंब्याचे जवळपास ५० स्टॉल असतील. हापूस, केशर आणि गावरान आंबा विक्रेते सहभागी होणार आहेत.


### इतरही उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध

■ यात कोकणातील आठ शेतकऱ्यांचा समावेश आहे. शिवाय लोणच्याची कैरी आणि मसालेही उपलब्ध असतील. ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळ, भगर या धान्यापासून तयार करण्यात आलेली उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. गुरुवारी सकाळी साडेनऊ वाजता महाराष्ट्र राज्य पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार आहे. मदार हरिभाऊ बागडे उपस्थित राहणार आहेत.

Punyanagari Dt. 22/05/2024

# बाजार समितीत उद्यापासून आंबा, मिलेट महोत्सव

**छत्रपती संभाजीनगर :** कृषी उत्पन्न बाजार समिती छत्रपती संभाजीनगर, महाकेशर आंबा बागायतदार संघ, मँगो ग्रोअर्स असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या वतीने 'आंबा व मिलेट महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. बाजार समितीच्या आवारात २३ ते २६ मे या कालावधीत सकाळी नऊ ते रात्री नऊ या वेळेत महोत्सव खुला असणार असल्याची माहिती कृऊबाचे सभापती डॉ. राधाकिसन पठाडे यांनी दिली.



जाधववाडी भागातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेश द्वारासमोर गुरुवारी २३ मे रोजी सकाळी साडेनऊ वाजता महाराष्ट्र राज्य पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होईल. यावेळी आमदार हरिभाऊ बागडे आणि बाजार समितीचे संचालक मंडळ उपस्थित राहणार आहे. महोत्सवात आंब्याचे जवळपास ५० स्टॉल असतील. हापूस, केशर आणि गावरान आंबा विक्रेते सहभागी होणार आहेत. त्यात कोकणातील आठ शेतकऱ्यांचा समावेश आहे. शिवाय, लोणच्याची कैरी आणि मसालेही उपलब्ध असतील. ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळ, भगर या धान्यापासून तयार करण्यात आलेली उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. जिल्ह्यातील महिला बचत गट आणि शेतकरी यांनी अधिक प्रमाणात महोत्सवात सहभाग घ्यावा, असे आवाहन सभापती पठाडे यांनी केले. या पत्रकार परिषदेला पणन मंडळाचे गजानन वाघ, बाजार समितीचे सचिव विजय शिरसाट, डी. एम. पालोदकर आणि पतंगे उपस्थित होते.

Punyanagari Dt. 22/05/2024

# 'ई-नाम' प्रणालीमध्ये बारामती बाजार समिती प्रथम

**। बारामती : प्रतिनिधी**

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकरी व व्यापाऱ्यांच्या हितासाठी मुख्य यार्ड, तसेच सुपे व जळोची उपबाजार आवारात विविध सोईसुविधा राबविल्याने स्मार्ट प्रकल्पांतर्गत बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीला राज्यातील ३०५ बाजार समित्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळाला आहे.

भारत सरकारच्या ई-नाम योजनेमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करण्यासाठी केंद्रीय कृषी शेतकरी कल्याण विभागाने कृषी व्यापार संघातर्फे लघुचित्रपट बनविला जाणार आहे. याकरिता देशातून आठ राज्यांतील आठ बाजार समित्यांची निवड झाली आहे. महाराष्ट्रातून पुणे जिल्ह्यातून बारामती बाजार समितीची निवड झाली आहे. डीडी किसान चॅनेल ई-नाम प्रणालीला सहाय्य करणार आहे. समितीचे सभापती सुनील पवार व उपसभापती नीलेश लडकत यांनी बारामती बाजार समितीचे विविध उपक्रमांची माहिती सांगून ई-नाम प्रणाली चांगल्या प्रकारे राबविण्याबाबत ग्वाही दिली. शेतकरी नोंदणी ६१८३० केली आहे. पैकी केवायसी घेऊन ११९६ कायमस्वरूपी शेतकरी तसेच ४४ खरेदीदार, ४२ आडते व राज्यातील रेशीम कोष खरेदीदार ७ व तामिळनाडू, कर्नाटक, केरळ, तेलंगणा, पश्चिम बंगाल इत्यादी राज्यातील ७ खरेदीदार लायसेन्सधारक नोंदणी झाली आहेत. तसेच रेशीम कोष खरेदीदार ऑनलाइन ट्रेडिंगमध्ये सहभागी होत आहेत. रेशीम कोष लिलाव ऑनलाइन घेतले जातात. यामध्ये शेतकरी नोंदणी, गेट एन्ट्री, कोषाची गुणवत्ता तपासणी, सेल रेशो त्यानंतर ऑनलाइन लिलाव व ॲक्सिस बँकेमार्फत ई-पेमेंट केले जाते. सन २०२२ पासून १७०० शेतकऱ्यांची १३१ टनाची कोष विक्री होऊन साधारण ७ कोटींची उलाढाल झाली आहे. बारामती रेशीम कोष खरेदी-विक्री केंद्रामध्ये ई-नाम प्रणालीद्वारे १०० टक्के ऑनलाइन पद्धती राबविण्यात येत असून देशभरातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालास चांगला व रास्त दर मिळणार आहे. धान्य मार्केटला ई-नाम प्रणालीत परपेठेतून कमी प्रतिसाद मिळत असून, शेतमालाचे ग्रेडिंग होऊन ई-नाम पोर्टलवर विक्री झाल्यास आंतरराज्य, इंटर मंडी ई-लिलाव व ई-पेमेंट होऊ शकतात, अशी माहिती सचिव अरविंद जगताप यांनी सांगितली.

Maha. Times Dt. 22/05/2024

# शहरात उद्यापासून आंबा महोत्सव

**म. टा. प्रतिनिधी,** छत्रपती संभाजीनगर

'उत्पादक ते ग्राहक' या अभिनव संकल्पनेतून आंबा व मिलेट महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवात राज्यभरातील शेतकरी सहभागी होणार आहेत. हापूस, केशर आंबा आणि कृषीपूरक उत्पादने खरेदी करता येतील, अशी माहिती बाजार समितीचे सभापती राधाकिसन पठाडे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

बाजार समिती छत्रपती संभाजीनगर, महाकेशर आंबा बागायतदार संघ, मँगो ग्रोअर्स असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या वतीने 'आंबा व मिलेट महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. बाजार समितीच्या आवारात २३ ते २६ मे या कालावधीत सकाळी नऊ ते रात्री नऊ या वेळेत महोत्सव खुला असणार आहे. गुरुवार, २३ मे रोजी सकाळी साडेनऊ वाजता महाराष्ट्र राज्य पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होईल. या वेळी आमदार हरिभाऊ बागडे आणि बाजार समितीचे संचालक मंडळ उपस्थित राहणार आहे. शिवाय, लोणच्याची कैरी आणि मसालेही उपलब्ध असतील. ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळ, भगर या धान्यापासून तयार करण्यात आलेली उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. जिल्ह्यातील महिला बचत गट आणि शेतकरी यांनी अधिक प्रमाणात महोत्सवात सहभाग घ्यावा, असे आवाहन पठाडे यांनी केले. या पत्रकार परिषदेला पणन मंडळाचे गजानन वाघ, बाजार समितीचे सचिव विजय शिरसाट, डी. एम. पालोदकर आणि पतंगे उपस्थित होते.

Lokmat Dt. 22/05/2024

# कृउबासमध्ये उद्यापासून आंबा, भरडधान्य महोत्सव

## चार दिवस : शेतकऱ्यांकडून थेट खरेदी

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर** : ग्राहकांना थेट शेतकऱ्यांकडून आंबा आणि भरडधान्य खरेदी करता यावे, यासाठी जाधववाडी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात २३ ते २६ मे दरम्यान आंबा आणि भरडधान्य (मिलेट) महोत्सव आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती कृउबा समितीचे सभापती डॉ. राधाकिसन पठाडे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. महाकेशर आंबा बागायतदार संघ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव होत असल्याचे त्यांनी सांगितले.

२३ मे रोजी सकाळी १० वाजता विधानसभेचे माजी सभापती आ. हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते आणि पणन महामंडळाचे संचालक संजय कदम यांच्या उपस्थितीत उद्घाटन होईल. गावरान आंबा उत्पादक शेतकरीही सहभागी होऊ शकतात. शेतकऱ्यांकडून शुल्क आकारले जात नाही. शेतकऱ्यांच्या राहण्याची व्यवस्था बाजार समितीकडून करण्यात आली आहे. यासोबतच ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, वरई इ. भरडधान्यांचे व इतरही स्टॉल महोत्सवात असतील. महोत्सव सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत सर्वांसाठी खुला आहे.



### गतवर्षी केशरचे ३६४५ क्रेट विक्री

गतवर्षी शहरात झालेल्या आंबा महोत्सवात केशर आंब्याचे ३६४५ तर हापूसचे १५६८ क्रेट विक्री झाले होते.

महाराष्ट्र टाइम्स नागपूर । मंगळवार, २१ मे २०२४

# चार दिवसांत ४० लाखांच्या आंब्यांची विक्री

## आंबा मिलेट धान्य महोत्सवाला प्रतिसाद; दरवर्षी होणार आयोजन

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

कोकणातील देवगडच्या हापूस आंब्यापासून ते थेट गडचिरोली जिल्ह्यातील जीवनगट्टा गावच्या 'गोला' या देशी आंब्यापर्यंत, खान्देशच्या ज्वारीच्या लाह्यांपासून वर्धा नागपूर जिल्ह्यातील केसर, दशेहरी ते सफेदापर्यंत असे वैशिष्ट्य असलेल्या आंबा मिलेट धान्य महोत्सवाला नागपूरकरांनी चांगला प्रतिसाद दिला. चार दिवस चाललेल्या या महोत्सवात ४० लाखांचे आंबे आणि २४ लाखांचे मिलेट, अशी एकूण ६४ लाखांची विक्री झाली, असे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने उत्तर अंबाझरी मार्गावरील कुसुमताई वानखेडे भवन येथे १६ ते १९ मेपर्यंत चाललेल्या आंबा मिलेट धान्य महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गडचिरोलीच्या जीवनगट्टा गावातील कृषी पदवी संपादन करणाऱ्या प्रणाली गावडे हिने आपल्या कौशल्यावर वैविध्यपूर्ण आंबाडी, टोमॅटो, लसूण लोणच्यासह गावातील देशी गोला आंब्याला हापूसच्या रांगेत आत्मविश्वासाने बसविले. या महोत्सवात एकूण ५७ स्टॉल्स होते. यातील २५ स्टॉल्स आंब्याचे आणि ३२ स्टॉल्स मिलेट धान्य पदार्थांचे होते. वरुडच्या प्रशांत वेखंडे या शेतकऱ्याने आपल्या शेतात पिकविलेले दशेहरी, लड्डू, लंगडा, सफेदा, चौसा हे नैसर्गिकरित्या पिकविलेले आंबे विक्रीस ठेवले होते. अनेक महिलांनी आपल्या वैविध्यपूर्ण उत्पादनांनी ग्राहकांचे लक्ष वेधून घेतले. ज्वारी बाजरी, नाचणी, वरई, राळा आदी मिलेट धान्यापासून तयार केलेले विविध प्रकार, बिस्किट, पापड, हळद, गावरान तेजा मिरची व लोणचे याठिकाणी विक्रीस उपलब्ध होते. मिळालेला प्रतिसाद बघता हा महोत्सव दरवर्षी भरविण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालयाचे उपसरव्यवस्थापक अजय कडू आणि व्यवस्थापक राजेश सरोदे यांनी सांगितले.



# कोल्हापूरकरांना आंब्यांची मेजवानी

**कोल्हापूर :** आता कोल्हापूरकरांना चार दिवस अस्सल हापूस आंब्याची चव चाखता येणार आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून राज्यात विविध ठिकाणी आंबा महोत्सव आयोजित करण्यात येत असून, त्याद्वारे कोल्हापूरकरांना थेट आंबा उत्पादक शेतकऱ्यांकडून आंबा खरेदी करता येणार आहे. येथे राज्यभरातील तब्बल ४७ आंब्यांच्या जातीचे प्रदर्शन भरले आहे.

## पणन मंडळाकडून आंबा महोत्सवाचे आयोजन

येथील पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयामार्फत दि. १९ ते २३ मे दरम्यान आंबा महोत्सव २०२४ चे भारत हाऊसिंग सोसायटी हॉल, राजारामपुरी येथे आयोजन केले आहे. या महोत्सव उद्घाटनप्रसंगी उत्पादक शेतकरी भारत सलगर, विभागीय सहनिबंधक अरुण काकडे, लीड बँकेचे व्यवस्थापक गणेश गोडसे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक सचिन कांबळे, कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, वारके



आण्णा, बबनराव रानगे उपस्थित होते. कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, रायगड या जिल्ह्यांतील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी या महोत्सवात ३२ स्टॉल मांडले आहेत. महाराष्ट्रात उत्पादित होणाऱ्या आंब्याच्या ४७ जातींचे प्रदर्शन मांडले आहे. विक्रीला हापूस व केशर आंबे उपलब्ध आहेत.

### या जातींच्या आंब्याचा समावेश

महोत्सवात हापूस, करूठा, कोलंबन, बैगनपल्ली, पायरी पंचदराकलशा, हिमायुद्दीन, राजुमन, वातगंगा, रत्ना, कोकण रुची, करुकम, काळा करेल, चेरूका रासम, विलाय कोलंबन, रानू कल्लू, जहाँगीर, नाजूक पसंद, कोंडूर गोवा, तोतापुरी, छोटा जहाँगीर, केसर, माया, कुलास, याकुती, कोरन, पदेरी, बनेशान, वनराज, पेढरबाम, दूधपेढा, बंगाली पायरी, नीलम, मोहनभोग आदी जातींच्या आंब्यांचा समावेश आहे.

“ महोत्सवात रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, पायरी, केसर व इतर विविध जातीचे आंबा उत्पादक शेतकरी वेगवेगळ्या जिल्ह्यांतून सहभागी झाले आहेत. ग्राहकांना भौगोलिक मानांकन प्राप्त कोकणातील अस्सल हापूस आंबा उत्पादकांकडून आंबा उपलब्ध होणार आहे. उपस्थित स्टॉलधारक शेतकऱ्यांच्या आंब्यांची नोंद पणन विभागाकडे झाल्याने त्यांच्याकडील उत्पादन चांगल्या प्रतीचे आहे.

– **डॉ. सुभाष घुले,** उपसरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ

**अगदी काही ग्रॅमपासून दोन ते तीन किलो वजनाचे आंबे या ठिकाणी पाहण्यासाठी ठेवण्यात आले आहेत. यामध्ये दीड किलो वजनाचा ‘वनराज’ हा आंबा आकर्षण ठरला आहे.**

Sakal Dt. 20/05/2024

# आंबा महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

## राज्य कृषी पणन मंडळाचे आयोजन : दीड किलोचा 'वनराज' आकर्षण

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : महाराष्ट्र राज्य पणन मंडळाच्या वतीने 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पनेतून राजारामपुरी आठव्या गल्लीतील भारत हौसिंग सोसायटीच्या सभागृहामध्ये कोल्हापूर आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवास ग्राहकांचा पहिल्याच दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, रायगड या आंबा उत्पादक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे स्टॉल या उत्सवात मांडण्यात आले आहेत. हा महोत्सव १९ ते २३ मे दरम्यान सुरू राहणार आहे. याशिवाय महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आढळणाऱ्या ४७ जातींचे आंबेही या प्रदर्शनात मांडण्यात आले आहेत. या महोत्सवात दीड किलो वजनाचा वनराज आंबा प्रदर्शनास भेट देणाऱ्या अबालवृद्धांचे प्रमुख आकर्षण ठरत आहे.





कोल्हापूर : राज्य पणन मंडळाच्यावतीने राजारामपुरीतील भारत हौसिंग सोसायटीत आयोजित करण्यात आलेल्या आंबा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी विभागीय सहनिबंधक अरूण काकडे यांच्यासह मान्यवरांनी महोत्सवाची पाहणी केली. दुसऱ्या छायाचित्रात आंबा महोत्सवातील सर्वांचे लक्ष वेधून घेणारा हाच तो दीड किलो वजनाचा वनराज आंबा.

या महोत्सवामध्ये रत्नागिरी हापूस, रायगड हापूस, देवगड हापूस, केशर आदी प्रकारचे आंबे विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. महोत्सवात उत्पादक ते ग्राहक अशी संकल्पना असल्याने खूप कोकणचा हापूस ३०० ते ७०० रुपये साईज, दर्जानुसार असे डझनाच्या दरात उपलब्ध आहेत. राज्यातील इतर जिल्ह्यांतील विविध आंब्यांचीही चव या महोत्सवात चाखण्याची संधीही पणन मंडळाने प्रदर्शनास भेट देणाऱ्या ग्राहकांना दिली आहे. त्यामुळे पहिल्याच दिवशी ग्राहकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

या महोत्सवाचे उद्घाटन विभागीय सहनिबंधक अरुण काकडे व आंबा उत्पादक शेतकरी भारत सलगर यांच्या हस्ते फित कापून झाले. यावेळी अग्रणी बँकेचे व्यवस्थापक गणेश गोडसे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक सचिन कांबळे, कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले उपस्थित होते.

### राज्यातील ४७ जातींचे आंबे

■ महोत्सवात हापूस, मोहन भोग, हिलाटिओ, करूठा कोलंबन, पायरी, बैंगनपल्ली, पंचदराकल्शा, मुशारद सस्तों, सुवर्णरखा, फर्नांडिन, वातगंगा, बंगाली पायरी, कोल्हापुरी रेड स्माल, दूध पेढा, विलभ, राजूमन, काळा करेल, ब्लॅक कोलमन, मानकुर, चित्रा सुवर्णरखा, बनेशाम, चेसका राजभ, किपिंग, नीलम, नेरूका रासम, पेढरबाम, जहांगीर, छोटा जहांगीर, सल्लू-कल्लू, माया, गोवा मानकूर, कुलास, कोंदूर गोवा, पदेरी, रत्ना, आम्लेट, केसर, हिमायुद्दीन, ओल्हूर, नाजूक पसंद, कोरल, काळा गंडहस, मिरांजीओ, करूक्कम, वनराज, याकुती, तोतापुरी यांचा समावेश आहे.

Pudhari Dt. 20/05/2024

# कोल्हापूर आंबा महोत्सवाचा प्रारंभ

## पाच दिवस चालणार; नैसर्गिकरित्या पिकलेला कोकण हापूस आंबा उपलब्ध

### एक ते दीड किलोचे आंबे उपलब्ध

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत राजारामपुरी परिसरात भारत हाऊसिंग सोसायटी सभागृहात सलग पाच दिवस चालणाऱ्या हापूस आंबा महोत्सवाचा प्रारंभ रविवारी झाला. उद्घाटन विभागीय सहनिबंधक अरुण काकडे यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा उपनिबंधक निलकंठ करे, 'माविम'चे व्यवस्थापक सचिन कांबळे, कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, बबन रानगे आदी उपस्थिथत होते.

महोत्सवात नैसर्गिकरित्या पिकलेला कोकणातील हापूस आंबा उपलब्ध केला आहे. कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम व सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील विविध शहरांत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजने अंतर्गत विविध फळ महोत्सवांचे आयोजन केले जाते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून, शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा हाच महोत्सवाचा उद्देश आहे. आंबा महोत्सवाला ग्राहकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असल्याचे डॉ. घुले यांनी सांगितले.

### या जातीचे आंबे उपलब्ध

या महोत्सवामध्ये प्रति डझन ३०० ते ७०० रुपये दराने आंबा उपलब्ध आहे. महाराष्ट्रात आढळणाऱ्या आंब्याच्या ४७ जातींचे वेगळे स्टॉल्स येथे आहेत. यात हापूस, करूठा, कोलंबन, बैगनपल्ली, पायरी पंचदराकलशा, हिमायुद्दीन, राजुमन, वातगंगा, रत्ना, कोकण रुची, करुकम, काळा करेल, चेरूका रासम, विलाय कोलंबन, रानू कल्लू, जहांगीर, नाजूक पसंद, कोंडूर गोवा, तोतापुरी, दूधपेढा, बंगाली पायरी, निलम, मोहनभोग या जातींच्या आंब्याचा समावेश आहे.

# कोल्हापूर आंबा महोत्सवास प्रारंभ

## महाराष्ट्रात उत्पादित होणाऱ्या आंब्याच्या ४७ जातींचे प्रदर्शन

### ■ ग्राहकांच्या गर्दीत उत्पादक ते ग्राहक थेट आंबा विक्रीला सुरूवात

**रोहा : *कोल्हापूर आंबा महोत्सवाचे उद्घाटन रविवारी ग्राहकांच्या प्रचंड गर्दीत झाले. उत्पादक शेतकरी भरत सलगर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व विभागीय सहनिबंधक अरुण काकडे यांच्या हस्ते फीत कापून महोत्सवाचे उद्घाटन झाले. तर लीड बँकेचे व्यवस्थापक गणेश गोडसे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक सचिन कांबळे, कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, वारके अण्णा, बबनराव रानगे यावेळी उपस्थित होते.***





महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय, कोल्हापूर यांच्या मार्फत १९ ते २३ मे दरम्यान कोल्हापूर आंबा महोत्सव २०२४ चे भारत हौसिंग सोसायटी हॉल, राजारामपुरी, कोल्हापूर येथे आयोजन करण्यात आलेले आहे. कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम व सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात विविध शहरांमध्ये आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. कोल्हापूरसह रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, रायगड या जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी या महोत्सवात ३२ स्टॉल मांडले आहेत. याशिवाय प्रदर्शनात महाराष्ट्रात उत्पादित होणाऱ्या आंब्याच्या ४७ जातींचे प्रदर्शन मांडले आहे. यामध्ये अस्सल व नैसर्गिकरित्या पिकविलेला हापूस आंबा खरेदी करता येईल. महोत्सवाची वेळ सकाळी ९ ते रात्री ९ अशी आहे.

पणन मंडळाकडून राज्यात विविध ठिकाणी आंबा महोत्सव आयोजित करण्यात येतो. आता कोल्हापूरकरांना सुद्धा हापूस आंब्याचा आनंद चार दिवस घेता येणार आहे. कोल्हापुरातील नागरिकांना थेट उत्पादक शेतकऱ्यांकडून आंबा खरेदी करता येणार आहे. आंबा महोत्सवामध्ये प्रति डझन ३०० ते ७०० रुपये दराने आंबा उपलब्ध आहेत. विक्रीसाठी हापूस व केशर आंबे उपलब्ध आहेत. शिवाय महाराष्ट्रातील विविध जातींच्या आंब्यांचा आस्वाद घेण्याची संधी यानिमित्ताने उपलब्ध झाली आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजने अंतर्गत विविध फळ महोत्सवांचे आयोजन करण्यात येत असते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून, शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा या महोत्सवांचा प्रमुख उद्देश असतो.

महोत्सवामध्ये रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, पायरी केसर व इतर विविध जातीचे आंबा उत्पादक शेतकरी वेगवेगळ्या जिल्ह्यातून सहभागी झाले आहेत. ग्राहकांना भौगोलिक मानांकन प्राप्त कोकणातील अस्सल हापूस आंबा उत्पादकांकडून आंबा उपलब्ध होणार आहे. उपस्थित स्टॉलधारक शेतकऱ्यांच्या आंब्यांची नोंद पणन विभागाकडे झाल्याने त्यांच्याकडील उत्पादन चांगल्या प्रतीचे असल्याचे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी सांगितले.

आंबा महोत्सवमध्ये ग्राहकांना आंब्याच्या विविध जाती माहीत होण्यासाठी राज्यातील आंब्याचे प्रदर्शन ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी या महोत्सवाला उपस्थित राहून चांगल्या प्रतीचे आंबे खरेदी करावेत. त्याचबरोबर प्रदर्शनाला भेट देवून नवी माहिती अवगत करावी असे आवाहन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी केले आहे.

#### दीड किलो वजनाचा 'वनराज'



**प्रदर्शनात अगदी काही ग्रॅमपासून दोन ते तीन किलो वजनाचे ४७ आंब्यांचे प्रकार या ठिकाणी पाहण्यासाठी ठेवण्यात आले आहेत. जेणेकरून ग्राहकांना या सर्व जाती प्रदर्शनामध्ये पहावयास मिळत आहेत. यामध्ये दीड किलो वजनाचा 'वनराज' हा आंबा आकर्षण ठरला आहे.**

#### आंब्याचे ४७ प्रकार...

**महोत्सवामध्ये महाराष्ट्रात आढळणाऱ्या आंब्याच्या ४७ जातीचे वेगळे दालन आहेत. यामध्ये हापूस, करूठा, कोलंबन, बैगनपल्ली, पायरी पंचदराकलशा, हिमायुद्दीन, राजुमन, वातगंगा, रत्ना, कोकण रुची, करूकम, काळा करेल, चेरूका रासम, विलाय कोलंबन, रानू कल्लू, जहांगीर, नाजूक पसंद, कोंडूर गोवा, तोतापुरी, छोटा जहांगीर, केसर, माया, कुलास, याकुती, कोरन, पढेरी, बनेशान, वनराज, पेढरबाम, दूधपेढा, बंगाली पायरी, निलम, मोहनभोग या जातींच्या आंब्याचा समावेश आहे.**

# महाराष्ट्राचा मॅग्नेट प्रकल्प फुलशेतीसाठी वरदान

## 'पणन'चे अप्पर मुख्य सचिव अनुप कुमार यांचे मत

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ॲग्री बिजनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प राज्यातील फुलशेतीसाठी वरदान असून हा देशातील यशस्वी प्रकल्प आहे, असे मत राज्याचे सहकार वं पणन विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुप कुमार यांनी व्यक्त केले.

मॅग्नेट प्रकल्पांतर्गत के. एफ. बायोप्लांट व तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (ता.१६) आयोजित फुले पीक उत्पादने व सुगीपश्चात संबंधी कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, राष्ट्रीय सुगी तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. सुभाष घुले, उपसंचालक राजेंद्र महाजन, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक माऊली दाभाडे, के. एफ. बायोप्लांटचे सरव्यवस्थापक आशिष फडके, आयसीएआरचे शास्त्रज्ञ डॉ. गणेश कदम, गणेशखिंड कृषी केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. मोहन शेटे, डॉ. विष्णु गराडे आणि फूल उत्पादक शेतकरी उपस्थित होते.



**पुणे : मॅग्नेट प्रकल्पांतर्गत फुले पीक उत्पादने व सुगीपश्चात संबंधी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना सहकार व पणन विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुपकुमार.**

Dt. 20/05/2024

# कोल्हापूर आंबा महोत्सवामध्ये ग्राहकांची गर्दी

## उत्पादक ते ग्राहक थेट आंबा विक्रीला सुरूवात

कोल्हापूर, ता.१९(प्रतिनिधी)-

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय, कोल्हापूर यांच्या मार्फत १९ ते २३ मे दरम्यान कोल्हापूर आंबा महोत्सव २०२४ चे 'भारत हौसिंग सोसायटी हॉल, राजारामपुरी, कोल्हापूर' येथे आयोजन करण्यात आलेले आहे. कोल्हापूरसह रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, रायगड या जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी या महोत्सवात ३२ स्टॉल मांडले आहेत.

याशिवाय प्रदर्शनात महाराष्ट्रात उत्पादित होणाऱ्या आंब्याच्या ४७ जातींचे प्रदर्शन मांडले आहे. उत्पादक शेतकरी भारत सलगर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व विभागीय सहनिबंधक अरुण काकडे यांच्या हस्ते फीत कापून आंबा महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी लीड बँकेचे व्यवस्थापक गणेश गोडसे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक सचिन कांबळे, कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, बारके आण्णा, बबनराव रानगे



उपस्थितीत होते.

पणन मंडळाकडून राज्यात विविध ठिकाणी आंबा महोत्सव आयोजित करण्यात येतो, आता कोल्हापूरकरांना सुद्धा हापूसचा आनंद चार दिवस घेता येणार आहे. कोल्हापुरातील नागरिकांना थेट उत्पादक शेतकऱ्याकडून आंबा खरेदी करता येणार आहे.

आंबा महोत्सवामध्ये प्रति डझन ३०० ते ७०० रुपये दराने आंबा उपलब्ध आहेत. विक्रीसाठी हापूस व केशर आंबे उपलब्ध आहेत. शिवाय महाराष्ट्रातील विविध जातीच्या आंब्यांचा आस्वाद घेण्याची संधी यानिमित्ताने उपलब्ध झाली आहे.

विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून, शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश असतो. महोत्सवामध्ये रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, पायरी केसर व इतर विविध जातीचे आंबा उत्पादक शेतकरी वेगवेगळ्या जिल्ह्यातून सहभागी झाले आहेत. स्टॉलधारक शेतकऱ्यांच्या आंब्याची नोंद पणन विभागाकडे झाल्याने त्यांच्याकडील उत्पादन चांगल्या प्रतीचे असल्याचे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी सांगितले.

**आंब्याचे ४७ प्रकार प्रदर्शनातून भेटीला**

महोत्सवामध्ये महाराष्ट्रात आढळणाऱ्या आंब्याच्या ४७ जातींचे वेगळे दालन तयार करण्यात आलेले आहे. यामध्ये हापूस, कलम्हा, कोलंबन, बैंगनपल्ली, पायरी पंचदराकलशा, हिमायुद्दीन, राजुमन, बालगंगा, रत्ना, कोकण रुची, कलकम, काळा कोरल, चेकचा रामस, विलाय कोलंबन, रानू कलमु, जहांगीर, नाजूक पसंद, कोतूर गोवा, तोतापुरी, छोटा जहांगीर, केसर, माया, कुलास, बखुती, कोरन, पटेरी, करेशान, वनराज, पेडारसाम, दूधपेडा, बंगाली पायरी, निलम, मोहनभोग या जातींच्या आंब्यांचा समावेश आहे.

Punyanagari Dt. 18/05/2024

# 'मॅग्नेट' प्रकल्प फूल शेतीला ठरतोय वरदान

## सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांचे प्रतिपादन

**। पुणे : प्रतिनिधी**

'मॅग्नेट' प्रकल्प हा देशातील एक यशस्वी प्रकल्प असल्याने एशियाई विकास बँकेकडे देशातील आठ ते नऊ राज्यांनी या प्रकल्पाची मागणी केली आहे. फूल शेतीमध्ये महाराष्ट्र हे एक अग्रेसर राज्य म्हणून पुढे आले असून, 'मॅग्नेट' प्रकल्प हा फूल शेतीस वरदान ठरत असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांनी केले.



आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पांतर्गत के. एफ. बायोप्लांट व राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे यांच्या संयुक्त विद्यमाने फुले पीक उत्पादने व सुगीपश्चात संबंधित कार्यशाळेचे उद्घाटन राज्याच्या सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांच्या हस्ते करण्यात आले; या वेळी ते बोलत होते.

या प्रसंगी 'मॅग्नेट' प्रकल्पाचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, पुणे जिल्हा बँकेचे संचालक माऊली दाभाडे, 'मॅग्नेट' प्रकल्पाचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, राष्ट्रीय सुगी तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. सुभाष घुले, राजेंद्र महाजन, आशिष फडके, डॉ. गणेश कदम, डॉ. मोहन शेटे, डॉ. विष्णू गरांडे, पंडित शिकारे, कैलास कुंभार, नितीन पाटील, चेतन भक्कड व राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञानाचे अधिकारी व कर्मचारी व राज्यातील १६८ फूल उत्पादक शेतकरी उपस्थित होते. या वेळी फूल पीक माहिती पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

अनुप कुमार म्हणाले की, नांदेड, धाराशिव इत्यादी जिल्ह्यांमध्येही फूल शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था हे फूल शेतीचे माहेरघर आहे. तरुण फूल उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन स्टार्टअपच्या माध्यमातून या संधीचा फायदा घेतला पाहिजे. फूल शेतीमध्ये मूल्य साखळी विकसित होण्याची आवश्यकता असून, यामुळेच फुलांचा समावेश 'मॅग्नेट' प्रकल्पात केला आहे.

या वेळी विनायक कोकरे यांनी 'मॅग्नेट' प्रकल्पाबाबतची माहिती सादर करून फूल शेतीसाठी 'मॅग्नेट' प्रकल्प कसा महत्त्वाचा आहे, याबाबत सांगितले.

तर, फूल शेतीसाठी मुदत कर्ज व खेळते भाग भांडवलासाठी 'मॅग्नेट' प्रकल्पांतर्गत फलोत्पादन व फूलपिकांसाठी एकूण प्रकल्प कालावधीत पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला असून याचाही फायदा फूल उत्पादक शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. अमोल यादव यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वर बांदल यांनी केले. तर, विश्वास जाधव यांनी आभार मानले.

> दरम्यान, उपस्थित उत्पादक शेतकऱ्यांना सोएक्स फ्लोरा या फुलाची निर्यात करणाऱ्या कंपनीच्या प्रक्षेत्रास भेट देऊन त्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या प्री कूलिंग, कोल्ड स्टोरेज, पॅक हाऊस, फुलांची काढणी व विपणन या संदर्भात कंपनीचे संचालक नरेंद्र पाटील व सरव्यवस्थापक धनंजय कदम यांनी मार्गदर्शन केले. 'मॅग्नेट' प्रकल्पांतर्गत राज्यातील शेतकऱ्यांनी मूल्य साखळी विकसित करण्यासाठी जास्तीत जास्त प्रस्ताव सादर करा.
>
> **– विनायक कोकरे,**
> संचालक, मॅग्नेट प्रकल्प

Kesari Dt. 18/05/2024

# महाराष्ट्राचा मॅग्नेट प्रकल्प फुलशेतीसाठी वरदान : अनुप कुमार

**पुणे :** आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ग्री बिजनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प राज्यातील फुलशेतीसाठी वरदान असून हा देशातील एक यशस्वी प्रकल्प आहे, असे राज्याचे सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार म्हणाले.

मॅग्नेट प्रकल्पांतर्गत के. एफ. बायोप्लांट व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी आयोजित फुले पिक उत्पादने व सुगी पश्चात संबंधी कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, राष्ट्रीय सुगी तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. सुभाष घुले, उपसंचालक राजेंद्र महाजन, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक माऊली दाभाडे, के. एफ. बायोप्लांटचे सरव्यवस्थापक आशिष फडके, आयसीएआरचे शास्त्रज्ञ डॉ.गणेश कदम, गणेश खिंड कृषी केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. मोहन शेटे, डॉ.विष्णु गराडे, फूल उत्पादक शेतकरी आदी उपस्थित होते.

फुल शेतीमध्ये मूल्य साखळी विकसित होण्याची आवश्यकता असून यामुळेच फुलांचा समावेश मॅग्नेट प्रकल्पात केल्याचे सांगून अनुपकुमार म्हणाले, तरुण फुल उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्टार्टअपच्या माध्यमातून या संधीचा फायदा घेतला पाहिजे. फुल शेतीमध्ये महाराष्ट्र राज्य हे एक अग्रेसर राज्य म्हणून पुढे आले असून नांदेड, धाराशिव आदी जिल्ह्यामध्ये फुल शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था हे फुल शेतीच्या मार्गदर्शनातील महत्वाची संस्था आहे, असेही ते म्हणाले.

कोकरे यांनी मॅग्नेट प्रकल्प बाबतची विस्तृत माहिती सादर करुन फुल शेतीसाठी प्रकल्पाचे महत्त्व विषद केले. मॅग्नेट प्रकल्पांतर्गत राज्यातील शेतकऱ्यांनी मूल्य साखळी विकसित करण्यासाठी जास्तीत जास्त प्रस्ताव सादर करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

फलोत्पादन व फुल शेतीसाठी मुदत कर्ज व खेळते भाग भांडवलासाठी मॅग्नेट प्रकल्पाच्या एफआयएल घटकांतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीचा फायदा फुल उत्पादक शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. अमोल यादव यांनी केले.

संरक्षित फुल शेती बाबत के.एफ. बायोप्लांटचे फडके, फुल शेती लागवड याबाबत आयसीएआरचे शास्त्रज्ञ डॉ. कदम यांनी व फुलांची काढणी व्यवस्थापन व निर्यात याबाबत पंडित शिकारे आदी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रामध्ये सर्व उपस्थित उत्पादक शेतकऱ्यांना सोएक्स फ्लोरा या फुलाची निर्यात करणाऱ्या कंपनीच्या प्रक्षेत्रास भेट देऊन त्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या प्री कुलिंग, कोल्ड स्टोरेज, पॅक हाऊस, फुलाची काढणी व विपणन या संदर्भात कंपनीचे संचालक नरेंद्र पाटील व सरव्यवस्थापक धनंजय कदम यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेसाठी तयार करण्यात आलेल्या 'फूल पीक माहिती पुस्तिकेचे' प्रकाशनही यावेळी करण्यात आले. कार्यशाळेस इंडिका फ्रेशचे पंडित शिकारे, मॅग्नेट प्रकल्पाचे कैलास कुंभार, नितीन पाटील, चेतन भक्कड, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे अधिकारी, कर्मचारी व राज्यातील फुल उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

Pudhari Dt. 17/05/2024

# कोल्हापुरात रविवारपासून आंबा महोत्सवाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य कृषी पणन मंडळाच्या कोल्हापूर कार्यालयातर्फे १९ ते २३ मेअखेर कोल्हापुरात आंबा महोत्सवाचे आयोजन राजारामपुरी येथील भारत हौसिंग सोसायटी हॉलमध्ये केले आहे. हा महोत्सव सकाळी ९ ते रात्री ९ सुरू असणार आहे, याचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी केले आहे.

महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, विभागीय सहनिबंधक अरुण काकडे, जिल्हा उपनिबंधक नीळकंठ करे, विभागीय कृषी सहसंचालक बसवराज बिराजदार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरुण भिंगारदिवे, समाजकल्याण खात्याचे उपायुक्त उमेश घुले, नाबार्डचे महाव्यवस्थापक आषुतोष जाधव, व्यवस्थापक गणेश गोडसे उपस्थित राहणार आहेत. महोत्सवामध्ये ३० स्टॉल असून रत्नागिरी, देवगड येथील आंबा उत्पादक शेतकरी सहभागी होणार आहेत.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



फूल पीक माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करताना अनुप कुमार, विनायक कोकरे, डॉ. सुभाष घुले व मान्यवर.

# फूलशेतीत मूल्यसाखळी विकसित होण्याची आवश्यकता

## अनुप कुमार यांचे मत; 'मॅग्नेट प्रकल्प' फूलशेतीसाठी वरदान

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित महाराष्ट्र अॅग्री बिजनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) हा देशातील एक यशस्वी प्रकल्प असून, मॅग्नेट प्रकल्प हा फूलशेतीसाठी वरदान आहे, असे मत राज्याचे सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांनी येथे व्यक्त केले.

तरुण फूल उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन स्टार्टअपच्या माध्यमातून या संधीचा फायदा घेतला पाहिजे आणि फूल शेतीमध्ये मूल्य साखळी विकसित होण्याची आवश्यकता आहे, असे मतही त्यांनी व्यक्त केले. आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित अॅग्री बिजनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पांतर्गत पणन मंडळाच्या तळेगाव दाभाडेतील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था व के. एफ. बायोप्लांटच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.१६) फुले-पीक उत्पादने व सुगी पश्चात हाताळणी संबंधीच्या कार्यशाळेचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन त्यांच्या हस्ते सकाळी झाले. त्यानंतर ते बोलत होते. या वेळी मॅग्नेट प्रकल्पाचे संचालक विनायक कोकरे, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक माऊली दाभाडे, मॅग्नेट प्रकल्पाचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, राष्ट्रीय सुगी तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. सुभाष घुले, उपसंचालक राजेंद्र महाजन, के. एफ. बायोप्लांटचे सरव्यवस्थापक आशिष फडके आदींसह राज्यातील १६८ फूल उत्पादक शेतकरी उपस्थित होते. या वेळी फूल पीक माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

ईश्वर बांदल यांनी सूत्रसंचालन केले, तर विश्वास जाधव यांनी आभार मानले.

Pune Edition
May 17, 2024 Page No. 09
Powered by: erelego.com

लोकमत

आंबा-मिलेट धान्य महोत्सवाला नागपूरकरांचा प्रतिसाद

# देवगडचा हापूस, जीवनगट्टाचा 'गोला'ची चव घ्यायची आहे का?

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** कोकणातल्या देवगडच्या हापूस आंब्यापासून ते थेट गडचिरोली जिल्ह्यातील जीवनगट्टा गावच्या 'गोला' या देशी आंब्यापर्यंत, खान्देशच्या ज्वारीच्या लाह्यापासून वर्धा नागपूर जिल्ह्यातील केसर, दशेरी ते सफेदापर्यंतची वैविधता ही 'आंबा मिलेट धान्य महोत्सवाचे' वैशिष्ट्ये ठरले आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढावा या उद्देशाने येथील कुसुमताई वानखेडे भवन येथे आंबा मिलेट धान्य महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.



गडचिरोलीच्या जीवनगट्टा गावातील कृषी पदवी संपादन करणाऱ्या प्रणाली गावडे हिने वैविध्यपूर्ण आंबाडी, टोमॅटो, लसूण लोणच्यासह गावातील देशी गोला आंब्याला हापूसच्या रांगेत आत्मविश्वासाने बसविले आहे.

आदिवासी महिलांकडून पारंपरिक



चालत आलेल्या कौशल्यावर आधारित अन्नप्रक्रियेला आता थोडे शास्त्रोक्त प्रक्रियेची जोड देऊन नैसर्गिक स्वरूपातच आंबाडी, टोमॅटो यांचे लोणचे, आवळा प्रक्रिया केलेले सिरप, मँगो ज्यूस असे मोजके उत्पादने घेऊन स्टॉल घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती प्रणाली गावडे हिने दिली. रानभाज्यांसह इतर उत्पादने तिने विक्रीला ठेवली आहेत.

या महोत्सवात एकूण ५७ स्टॉल्स आहेत. यातील २५ स्टॉल्स आंब्याचे आहेत व ३२ स्टॉल्स मिलेट धान्य पदार्थाचे आहेत.

वरुडच्या प्रशांत वेखंडे या शेतकऱ्याने आपल्या शेतात पिकविलेले दशेरी, लड्डू, लंगडा, सफेदा, चौसा ही नैसर्गिकरीत्या पिकविलेले आंबे विक्रीस ठेवले आहेत. अनेक महिलांनी वैविध्यपूर्ण उत्पादनांनी ग्राहकांचे लक्ष वेधून घेतले आहेत. ज्वारी, बाजरी, नाचनी, वरई, राळा आदी मिलेट धान्यापासून तयार केलेले विविध प्रकार, बिस्कीट, पापड, हळद, गावरान तेजा मिरची व लोणचे या ठिकाणी विक्रीस उपलब्ध आहेत.

# ईगल न्यूज

• वर्ष 3 रे • संपादिका ~सौ.शालन कोळेकर
• https://eaglenews.co.in • संपर्क~9422420611 • रजि.नं.M.H.28-0005304
Friday / 17-05-2024


# १९ मे पासून 'कोल्हापूर आंबा महोत्सव' २०२४ चे आयोजन



## महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत कोल्हापूर शहरात दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजना अंतर्गत विविध फल महोत्सवांचे आयोजन

### विलासराव कोळेकर यांजकडून..

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत कोल्हापूर शहरात दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजना अंतर्गत विविध फल महोत्सवांचे आयोजन करण्यात येत असते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून, शेतक-यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा या महोत्सवांचा प्रमुख उद्देश असतो.महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय, कोल्हापूर मार्फत दि. 19 ते 23 मे 2024 या कालावधीमध्ये 'कोल्हापूर आंबा महोत्सव 2024' चे 'भारत हौसिंग सोसायटी हॉल, राजारामपुरी, कोल्हापूर' येथे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर आंबा महोत्सवाचे उद्धघाटन रविवार दि. 19 मे रोजी सकाळी 11. 00 वा. मा. श्री. अमोल येडगे सो. (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे शुभहस्ते करण्यात येणार आहे. सदर उद्घाटन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन मा. श्री. सुनील फुलारी, विशेष पोलिस महानिरीक्षक कोल्हापूर, मा. श्री. अरुण काकडे, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर, मा. श्री. निळकंठ करे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर, मा. श्री. बसवराज बिराजदार, विभागीय कृषि सहसंचालक, मा. श्री. अरुण भिंगारदिवे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कोल्हापूर, मा. श्री. आषुतोष जाधव, महाव्यवस्थापक, नाबार्ड, कोल्हापूर,मा. श्री. उमेश घुले, उपायुक्त, समाजकल्याण, कोल्हापूर, मा. श्री. गणेश गोडसे, व्यवस्थापक हे उपस्थित राहणार आहेत.महोत्सवामध्ये रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, पायरी केसर व इतर विविध जातीचे आंबा उत्पादक शेतकरी सहभागी होणार आहेत. महोत्सवामध्ये आंबा उत्पादक याना 30 स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ग्राहकांना भौगोलिक मानांकन प्राप्त कोकणातील अस्सल हापूस आंबा उत्पादकांकडुन आंबा उपलब्ध होणार आहे.सदर आंबा महोत्सव मध्ये ग्राहकांना आंब्याच्या विविध जात माहीत होण्यासाठी राज्यातील आंब्याचे प्रदर्शन ठेवणार आहोत. महोत्सवाचे वेळ सकाळी 9 ते रात्री 9 असणार आहे सदर उद्घाटन कार्यक्रमास करवीरवासियांनी उपस्थित राहुन आंबा महोत्सवास भेट देण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी केले आहे

Dt. 17/05/2024

# गड़चिरोली का 'गोला' और कोंकण के 'हापूस' का जलवा

## मैंगो महोत्सव में मचा रहे धूम, नागरिकों का भारी प्रतिसाद





■ नागपुर, निज संवाददाता. सिटी के कुसुमताई वानखेड़े भवन में शुरू हुए 4 दिवसीय मैंगो व धान्य महोत्सव में गड़चिरोली के जीवनगट्टा गांव के गोला देसी आम से लेकर कोंकण का हापूस आम धूम मचा रहा है. महोत्सव को पहले ही दिन नागरिकों का भारी प्रतिसाद मिला. यहां वर्धा जिले का केसर, दशहरी से लेकर सफेदा किस्म के आम की खुशबू लोगों को आकर्षित कर रही है. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडल के माध्यम से किसानों के आत्मविश्वास को बढ़ाने के उद्देश्य से इस महोत्सव का आयोजन किया गया है. गड़चिरोली के जीवनगट्टा गांव की प्रणाली गवडे ने आंबाडी, टमाटर, लहसुन के अचार, गांव का देसी गोला आम अपने स्टॉल में रखा है. वह एग्रीकल्चर में स्नातक हैं. वह अपनी मां द्वारा स्थापित आदिवासी महिला बचत गट को कृषि उत्पादों से जोड़कर कैसे आर्थिक लाभ लिया जा सकता है उसका प्रयास कर रही है. महोत्सव में अनेक किस्म के आम बिक्री के लिए रखे गए हैं. कुल 57 स्टाल्स में 25 तो आम के ही हैं. 32 में मिलेट धान्य पदार्थों का प्रदर्शन व बिक्री के लिए रखा गया है. ज्वारी, बाजरी, नाचनी, वरई, राला आदि मिलेट अनाज से तैयार विविध प्रकार के बिस्किट, पापड़, हल्दी, गावरानी तेजा मिरची व अचार लोगों को आकर्षित कर रहे हैं. महोत्सव 19 मई तक सुबह 9 से रात 9 बजे तक सभी के लिए खुला रहेगा.

लोकमत

# नागपुरात पहिल्यांदाच आंबा व मिलेट महोत्सव

## १६ ते १९ मे दरम्यान आयोजित महोत्सवात राज्यातील उत्पादक सहभागी होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या नागपूर येथील विभागीय कार्यालयातर्फे पहिल्यादांच नागपुरात आंबा, मिलेट व धान्य अशा एकत्रित महोत्सवाचे आयोजन १६ ते १९ मेच्या दरम्यान उत्तर अंबाझरी मार्गावरील कुसुमताई वानखेडे भवन येथे करण्यात आले आहे. या महोत्सवाचे कृषी पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे संचालक अजय कडू यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष घोषित केले आहे. महराष्ट्र श्री अन्न अभियान सुरू केले आहे. तृणधान्यांचे पोषण आहारात असलेले महत्त्व विचारात घेऊन जास्तीतजास्त लोकांच्या आहारातील तृणधान्याचा वापर वाढविणे आवश्यक आहे. यावेळी नागपूर विभागीय व्यवस्थापक राजेश सरोते उपस्थित होते.

### महोत्सवात एक कोटीचा आंबा

महोत्सवामध्ये एक कोटी रुपयांचा आंबा येण्याची अपेक्षा आहे. यात रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील हापूस, तसेच राज्यातील इतर भागांतील केशर आंबा उत्पादकांचा सामावेश असणार आहे, तसेच महाराष्ट्रातल्या सर्व भागांतून मिलेट व धान्य उत्पादक त्याच्या शेतमालाची कोणत्याही मध्यस्थाविना थेट ग्राहकांना विक्री करणार आहे.

LIC NOTICE

बिझनेस न्यूज

प्रचंड खपाचे एकमेव विश्वास व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# 'पणन'चा आंबा महोत्सव बुधवारपासून चिंचवडमध्ये

पुणे : पुढारी वृत्तसेवा

- पणन मंडळाचे कार्यकारी संचालक कदम यांची माहिती
- 'शेतकरी ते थेट ग्राहक' उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुणे विभागीय कार्यालयाच्या पुढाकाराने १५ ते १९ मे या कालावधीत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. तरी आंबा उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक योजनेंतर्गत ग्राहकांनी आंबा खरेदीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे.

आंबा महोत्सवामध्ये सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकरी सहभागी होणार आहेत. महोत्सवामध्ये २० स्टॉलची उभारणी करण्यात येत असून, महोत्सवाची वेळ सकाळी नऊ ते रात्री नऊपर्यंत राहील, अशी माहिती मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी दिली. गेल्या २२ वर्षांपासून आंबा महोत्सवाचे आयोजन पणन मंडळाकडून करण्यात येत असून, कोकणातील उत्तम, दर्जेदार व नैसर्गिकरीत्या पिकविलेल्या हापूस आंब्याच्या खरेदीची सुवर्णसंधी पिंपरी-चिंचवडमधील ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. शिवाय, थेट शेतकऱ्यांचा शेतकऱ्यांकडून थेट विक्री होणाऱ्या आंब्याची खरेदी करण्याची संधी असल्याची माहिती मंडळाचे पुणे विभागीय उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन यांनी दिली.

Pune Edition
May 14, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

Agrowon Dt. 14/05/2024

# शेतकरी-ग्राहक बाजार जाचक अटींमुळे अडगळीत

## अधिनियमातील तरतूद रद्द करण्याची शिफारस

**दांगट समिती अहवाल : भाग ४**

**बाळासाहेब पाटील** : ॲग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : शेतीमालाला योग्य भाव मिळण्यासाठी आणि शेतकऱ्याला बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी पणन अधिनियमात दुरुस्ती करून सुरू करण्यात आलेल्या शेतकरी-ग्राहक बाजार आता अडगळीत पडला आहे. जाचक अटींमुळे हा बाजार बंद असून आंध्र प्रदेशमधील रयतु बाजारच्या धर्तीवर बाजार समितीच्या आवारातच शेतकरी-ग्राहक बाजारही चालू शकले नसल्याचे वास्तव दांगट समितीच्या अहवालात मांडण्यात आले आहे. त्यामुळे अधिनियमात दुरुस्ती करून केलेली तरतूद काढून टाकावी, अशी शिफारस दांगट समितीने केली आहे.

२००५ मध्ये महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम-१९६३ मध्ये दुरुस्ती करून शेतकरी -ग्राहक बाजार स्थापन करण्याची तरतूद समाविष्ट केली. यानुसार ज्या व्यक्तीला शेतकरी-ग्राहक बाजार स्थापन करायचा आहे त्यांना परवाना देण्यात येणार होता. मात्र, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्राच्या आत तो न करण्याची तरतूदही यात केली होती. शेतकरी बाजारासाठी, पूर्ण मालकी हक्क असलेल्या किंवा कमीत कमी तीन वर्षांच्या कालावधीकरिता भाडेपट्ट्याने एक एकर जागा आवश्यक होती. तसेच परवान्यासाठी अर्ज करताना संबंधिताला एक लाख रुपयांची बँक हमी संचालकांकडे जमा करण्याची अट घालण्यात आली होती. या बाजारात शेतकऱ्याला एका ग्राहकाला दहा किलोग्रॅमपेक्षा अधिक फळे आणि भाजीपाला किंवा अन्य नाशवंत माल विकता येणार नव्हता. तसेच ५० किलोपेक्षा अधिक अन्नधान्य किंवा अनाशवंत माल या बाजारात विकता येणार नाही, अशी अट घालण्यात आली होती.

शेतकरी-ग्राहक बाजार स्थापन करण्याची तरतूद करून १८ वर्षे झाल्यानंतर अद्याप एकही शेतकरी-ग्राहक बाजार स्थापन झालेला नाही. या योजनेचा लाभ घेण्यासाठी एकही अर्ज आलेला नाही. हा बाजार सुरू करण्यासाठी घालण्यात आलेली एक एकराची अट हीच मुख्य अडचण आहे. तसेच हा किरकोळ स्वरूपाचा बाजार असून यात ५० किलोपेक्षा जास्त माल विक्री करू नये, अशी अट घातल्याने ती अडचणीची ठरत आहे. हे बाजार शहरालगत असणे अपेक्षित आहे. मात्र, शहरांमध्ये किंवा शहरांजवळच्या जागांची उपलब्धता, भाडे किंवा ती खरेदी करण्यासाठी लागणारी रक्कम अव्वाच्या सव्वा असल्याने ही अट काढून टाकली पाहिजे अशी शिफारस समितीने केली आहे. जमिनीचे भाव, त्याची खरेदी, सोयी सुविधा उभारणीसाठी केलेला खर्च मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच घाऊक विक्रीला परवानगी नसल्याने आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे राज्यात यापूर्वीच बाजार समित्यांच्या आवारात आंध्र प्रदेशातील रयतु बाजारच्या धर्तीवर सुरू केलेले बाजार चालू शकले नाहीत.

**(समाप्त)**

### १० गुंठे जागेची अट व्यवहार्य

शेतकरी-ग्राहक बाजार स्थापन करण्यासाठी पूर्ण मालकी हक्क असलेली किंवा ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने घेतलेली किमान एक एकर जागेची अट काढून टाकून ती १० गुंठे ठेवण्याची अट व्यवहार्य ठरेल. तसेच या जागेवर लिलावगृहे उभारण्याची अटही काढून टाकावी अशी शिफारस केली आहे. वास्तविक कृषी विभागामार्फत शेतकरी आठवडी बाजार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत दैनिक शेतीमाल बाजारात मोठ्या प्रमाणात विकला जातो. त्यामुळे अधिनियम दुरुस्ती करून केलेली तरतूद काढून टाकण्याचा धोरणात्मक निर्णय घ्यावा, असेही दांगट समितीकडून सूचविण्यात आले आहे.

Pudhari Dt. 14/05/2024

# 'पणन'चा आंबा महोत्सव बुधवारपासून चिंचवडमध्ये

- पणन मंडळाचे कार्यकारी संचालक कदम यांची माहिती
- 'शेतकरी ते थेट ग्राहक' उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुणे विभागीय कार्यालयाच्या पुढाकाराने १५ ते १९ मे या कालावधीत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. तरी आंबा उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक योजनेंतर्गत ग्राहकांनी आंबा खरेदीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे.

आंबा महोत्सवामध्ये सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकरी सहभागी होणार आहेत. महोत्सवामध्ये २० स्टॉलची उभारणी करण्यात येत असून, महोत्सवाची वेळ सकाळी नऊ ते रात्री नऊपर्यंत राहील, अशी माहिती मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी दिली. गेल्या २२ वर्षांपासून आंबा महोत्सवाचे आयोजन पणन मंडळाकडून करण्यात येत असून, कोकणातील उत्तम, दर्जेदार व नैसर्गिकरीत्या पिकविलेल्या हापूस आंब्याच्या खरेदीची सुवर्णसंधी पिंपरी-चिंचवडमधील ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. शिवाय, थेट शेतकऱ्यांचा शेतकऱ्यांकडून थेट विक्री होणाऱ्या आंब्याची खरेदी करण्याची संधी असल्याची माहिती मंडळाचे पुणे विभागीय उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन यांनी दिली.

Agrowon Dt. 13/05/2024

# दरात खासगीच्या तुलनेत बाजार समित्याच वरचढ

## बाजार शुल्कात मात्र खासगी अधिक स्वस्त

**दांगट समिती अहवाल : भाग ३**

**बाळासाहेब पाटील : ॲग्रोवन वृत्तसेवा**

मुंबई : राज्य सरकारने खासगी बाजार आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या अभ्यासासाठी नेमलेल्या दांगट समितीने केलेल्या तुलनात्मक अभ्यासात कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्येच जास्त भाव मिळत असल्याचे समोर आले आहे. २०२०-२१ या वर्षात २१ पैकी १३, २०२१-२२ या वर्षात २२ पैकी १७, तर २०२३ या वर्षांत ३० पैकी २४ प्रकारच्या शेतीमालास सरासरी जास्त भाव मिळाल्याचे समोर आले आहे. मात्र त्याचवेळी शेतकरी, व्यापारी, आणि खरेदीदारांना खासगी बाजारात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तुलनेत कमी खर्च येत असल्याचे समोर आले आहे. हमाली, तोलाईत २० ते ३० टक्के, तर अडत आणि बाजार शुल्कात ५० टक्क्यांचा फरक पडत असल्याचे समोर आले आहे.

समितीने दिलेल्या अहवालात म्हटले आहे, की २०२०-२१ या बाजार वर्षात कापूस, रेशीम कोष, बाजरी, ज्वारी, गहू, उडीद, हरभरा, मूग, तूर, भुईमूग, कांदा आणि हळदीला खासगी बाजाराच्या तुलनेत जास्त दर मिळाला. यामध्ये ज्वारीला खासगी बाजारापेक्षा ६७ रुपये, हळदीला २६, बाजरीला १४, मुगाला २५ रुपये दर मिळाला आहे. तर साळ, कुळीथ, मका दाणे, लिंबू, डाळिंब, मका कणीस, टोमॅटो या शेतीमालाला खासगी बाजारात जास्त दर मिळाला आहे.

२०२१-२२ या बाजार वर्षात २२ प्रकारच्या शेतीमालापैकी १७ प्रकाराच्या शेतीमालाला बाजार समित्यांत जास्त, तर पाच शेतीमालांना खासगी बाजारात जास्त दर मिळाला आहे. यात कापूस, बाजरी, रेशीम,ज्वारी, गहू, खपली गहू, उडीद, हरभरा, मूग, कुळीथ, मका दाणे, तीळ, सोयाबीन, लिंबू, कांदा आणि हळदीचा समावेश आहे. तर भुईमूग, करडई डाळिंब, मका कणीस साळ या शेतीमालाला खासगी बाजारात जास्त दर मिळाला आहे. २०२२-२३ मध्ये २४ शेतीमालाला कृषी उत्पन्न बाजार समितीत जास्त दर मिळाला आहे. (क्रमशः)

### खासगी बाजारात खर्च २० टक्क्यांनी कमी

बाजार समित्यांत विक्रीपूर्व आणि विक्रीपश्चात येणाऱ्या खर्चाची तुलना करता खासगी बाजारात कमी खर्च येतो, तर कृषी उत्पन्न बाजार समित्यांत हमाल, तोलाई, आडत यामुळे खर्चात वाढ होते. 'एपीएमसी'त हमाली-तोलाईचा खर्च प्रतिक्विंटल १४ ते १५ रुपये आहे, तर खासगी बाजारात तोच खर्च ९ ते १० रुपये आहे. बाजार शुल्कात 'एपीएमसी'त प्रति शंभर रुपयांस ७५ पैसे ते १ रुपयापर्यंत निश्चित केला आहे. त्यापेक्षा कमी शुल्क आकारता येत नाहीत. खासगी बाजारात असे शुल्क निश्चित नाही तरीही ६० पैसे ते ५० पैसे किंवा त्यापेक्षा कमी बाजार शुल्क घेतले जाते. खासगी बाजारात बाजार चालक हाच खरेदीदार असल्याने शुल्काचा प्रश्नच उद्‌भवत नाही. 'एपीएमसी'त नाशिवंत शेतीमालाच्या किमतीवर कमाल सहा टक्के अडत दर आहे. तर बिगरनाशिवंत मालासाठी तीन टक्के अडत घेतली जाते. मुंबईत मात्र हा दर १० टक्क्यांचा आहे. खासगी बाजार समित्यांमध्ये विनाअडत्या व्यवहार होत असल्याने तेथे अडत घेतली जात नाही. हमाली, तोलाई या स्वरूपाचा शेतकऱ्यास येणारा खर्च खासगी बाजारात २० ते ३० टक्क्यांनी कमी येतो. तर अडत आणि बाजार फी खासगी बाजारात ५० टक्क्यांपेक्षा कमी येतो.

Agrowon Dt. 13/05/2024

# संत्रा पट्ट्यात वाढत आहेत निर्यातपूरक प्रकल्प

## टिकवण क्षमता वाढीसाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांचा पुढाकार; 'स्मार्ट'मधून अनुदान

**विनोद इंगोले : ॲग्रोवन वृत्तसेवा**

अमरावती : संत्र्याची टिकवण क्षमता वाढावी याकरिता ग्रेडिंग आणि त्यावर वॅक्स कोटिंगची प्रक्रिया केली जाते. सुरुवातीला मर्यादित संख्येत असलेल्या या प्रकल्पांची संख्या नजीकच्या काळात सुमारे १६ पेक्षा अधिक झाली आहे. आता या प्रकल्पांमध्ये श्रमजीवी नागपूर संत्रा उत्पादक कंपनी लि.च्या नव्या प्रकल्पाची देखील भर पडली आहे. तब्बल तीन कोटी रुपयांतून या प्रकल्पाची उभारणी होत आहे.

चव आणि रंगसंगतीच्या बाबतीत नागपुरी संत्र्याने जागतिकस्तरावर वेगळेपण जपले आहे. परंतु केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्थेच्या निष्क्रियतेमुळे या फळपिकात अपेक्षित संशोधन झाले नाही. परिणामी, उत्पादकता व उत्पन्नाच्या बाबतीत हे फळपीक काहीसे माघारले आहे. नजीकच्या काळात त्यावर कीड-रोगांचा प्रादुर्भावही वाढता आहे. त्यावरही उपाय शोधण्यात संस्था अपयशी ठरली आहे.



**अमरावती : वरुड येथील श्रमजीवी नागपूर संत्रा उत्पादक कंपनीच्या वतीने तीन कोटी रुपये खर्चातून संत्रा निर्यातीसाठीच्या प्रकल्पाची उभारणी होत आहे.**

विदर्भातील शेतकऱ्यांसाठी हे मुख्य फळपीक असल्याने त्यांच्यास्तरावर मात्र ग्रेडिंग, कोटिंग, प्रीकूलिंग यांसारख्या पर्यायातून हे पीक वाचविण्याचा प्रयत्न होत आहे. सुरुवातीला अवघ्या २-३ अशा प्रमाणात असलेल्या अशा युनिटची संख्या आजच्या घडीला २१ पेक्षा अधिक झाली आहे.

### ...अशी आहे क्षमता

वरुड येथील श्रमजीवी नागपूर संत्रा उत्पादक कंपनीकडून प्रस्तावित ग्रेडिंग कोटिंग युनिटची क्षमता पाच टन प्रति तास अशी आहे तर प्रीकूलिंग चेंबरची क्षमता प्रति तास आठ टन अशी आहे. ३ कोटी ३१ लाख रुपयांचा हा प्रकल्प आहे. स्मार्ट प्रकल्पातून अनुदानावर त्याची उभारणी होत असून, त्याकरिता ३० वर्षांच्या भाडेतत्त्वावर जागा घेण्यात आली आहे.

**" संत्रा निर्यातीकरिता दुबई २२, तर शांघायला २७ दिवस लागतात. त्यासाठी रेफर कंटेनरची गरज राहते. याकरिता कोल्डचेन विकसित करावी लागते. अशावेळी सुरुवातीच्या टप्प्यात प्रीकूलिंग करावे लागते. बांगलादेशला तीन- चार दिवसांत निर्यात शक्य होत असल्याने प्रीकूलिंगची गरज नाहीत. आमच्या शेतकरी उत्पादक कंपनीने ग्रेडिंग-कोटिंगसह निर्यातीच्या अनुषंगाने प्रीकूलिंग यंत्रणा उभारण्याचे काम होती घेतले आहे.**

**- रमेश जिचकार,**
मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रमजीवी नागपूर संत्रा उत्पादक कंपनी, वरुड, अमरावती

वॅक्स कोटिंगमुळे आठ दिवसांची टिकवण क्षमता १५ दिवसांवर पोहोचते. त्यासोबतच फळाची चकाकी वाढत असल्याने त्याला बाजारात ग्राहकांची मागणी राहते, असे वरुड येथील श्रमजीवी नागपूर संत्रा उत्पादक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश जिचकार यांनी सांगितले.

Agrowon Dt. 13/05/2024

# बारामती बाजार समिती 'ई-नाम'मध्ये राज्यात प्रथम

## गूळ, तेलबिया या प्रणालीत समाविष्ट करण्याचा समितीचा मानस

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकरी व व्यापाऱ्यांच्या हितासाठी मुख्य यार्ड तसेच सुपे व जळोची उपबाजार आवारात विविध सोई-सुविधा राबविलेल्या आहेत. बारामतीच्या मुख्य यार्डात २०१९ पासून रेशीम कोष खरेदी विक्री ई-नाम प्रणाली वापरली जात आहे. या प्रणालीला स्मार्ट प्रकल्पांतर्गत बारामती बाजार समितीला राज्यातील एकूण ३०५ बाजार समित्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळाला आहे.

भारत सरकारच्या ई-नाम योजनेमध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांना सहभागी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. केंद्रीय कृषी शेतकरी कल्याण विभागाच्या कृषी व्यापार संघातर्फे लघू चित्रपट बनविला जाणार आहे. त्याकरिता देशातून ८ राज्यांतील आठ बाजार समित्यांची निवड झाली आहे. त्यात राज्यातून बारामती बाजार समितीची निवड झाली आहे.

बारामतीमध्ये रेशीम कोष खरेदी विक्री केंद्रावर रेशीम कोषाची ई-लिलाव पद्धती २८ सप्टेंबर २०२२ पासून सुरू केलेली आहे. त्यानुसार डीडी किसान वाहिनीतर्फे बारामती बाजार समितीची विविध उपक्रमांची शूटिंग करण्यात आली आहे. डीडी किसान वाहिनी ई-नाम प्रणालीला साह्य करणार आहे. त्यामध्ये शेतकरी, एफपीओ, व्यापारी, ई-नामच्या यशस्वी गोष्टी, चित्रफिती प्रसारित करण्यात येणार आहेत. समितीचे सभापती सुनील पवार आणि उपसभापती नीलेश लडकत यांच्या मार्गदर्शनाखाली ई-नाम प्रणाली चांगल्या प्रकारे राबविण्यात येत आहे. भविष्यात गूळ आणि तेलबिया ई-नाम प्रणालीमध्ये घेण्याचा समितीचा मानस आहे.

"शेतकऱ्यांनी नाव नोंदणी व शेतीमालाच्या नोंदणीसाठी सहकार्य करावे. तसेच खरेदीदार व आडत्यांनी ई-नाममध्ये सहभागी व्हावे. यामुळे देशातील बाजार समित्या एका ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवर येतील. आंतरराज्यातील व्यापारास चालना मिळेल. तसेच देशभरातील शेतीमालास चांगला दर मिळेल. धान्य मार्केटला ई-नाम प्रणालीत कमी प्रतिसाद मिळत आहे. शेतीमालाचे ग्रेडिंग होऊन त्याची ई-नाम पोर्टलवर विक्री झाल्यास आंतरराज्य, इंटर मंडी ई-लिलाव व ई-पेमेंट होऊ शकते," अशी माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली. तमिळनाडू, कर्नाटक, केरळ, तेलंगणा, पश्चिम बंगालमधील ७ खरेदीदार या प्रणालीत सहभागी झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

### कोषाची १३१ टन विक्री

रेशीम कोष खरेदीदार ऑनलाइन ट्रेडिंगमध्ये सहभागी होत आहेत. रेशीम कोष लिलाव ऑनलाइन घेतले जातात. यामध्ये शेतकरी नोंदणी, प्रवेश नोंदणी, कोषाची गुणवत्ता तपासणी, विक्री रेशो, त्यानंतर ऑनलाइन लिलाव आणि ॲक्सिस बँकेमार्फत ई-पेमेंट केले जाते. २०२२ पासून १७०० शेतकऱ्यांच्या १३१ टन कोषाची विक्री होऊन साधारण ७ कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे.

गणेश कोरे

# अक्षय तृतीयेसाठी फुलली पुण्याची आंबा बाजारपेठ

**हापूस आंब्याचा हंगाम सध्या जोमात आहे. अक्षय तृतीयेला आंब्याचे मोठे महत्त्व असते. या सणापासून आंब्याची मागणी प्राधान्याने वाढत जाते. मागील वर्षी हवामानाच्या संकटामुळे आंब्याची आवक तुलनेने कमी होती. यंदाचे चित्र मात्र तुलनेने समाधानकारक आहे. येत्या शुक्रवारी (ता. १०) अक्षय तृतीया असून त्यानिमित्ताने पुणे बाजार समितीमधील आंबा बाजारपेठ फुलली आहे. त्यानिमित्त घेतलेला आढावा.**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय तृतीया सणापासून आंब्याला मागणी वाढत जाते. येत्या शुक्रवारी (ता. १०) हा सण असून त्यानिमित्ताने पुणे बाजार समितीमधील आंबा बाजार फुलला आहे. कोकणासह परराज्यांतून मोठी आवक होत आहे. यावर्षीच्या हंगामाबाबत समितीमधील अडते असोसिएशनचे सचिव आणि कोकण हापूस आंब्याचे प्रमुख अडतदार करण जाधव यांनी माहिती दिली. ते म्हणाले गेल्या वर्षी ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये ऐन मोहरात आंब्याला अवकाळी पावसाचा, तर फळधारणेच्या अवस्थेत गारपिटीचा फटका बसला. त्यामुळे गेल्या वर्षी ऐन अक्षय तृतीयेस मोठ्या प्रमाणावर आंबाटंचाई निर्माण झाली होती. यापूर्वी अशी परिस्थिती आम्ही व शेतकऱ्यांनी कधी अनुभवली नव्हती. त्यामुळे गेल्या वर्षी आंब्याचे दर प्रति डझनला एक हजार रुपयांपर्यंत होते. अनेक ग्राहकांना पूजेसाठी देखील आंबा उपलब्ध नव्हता. या वर्षी मात्र हवामानाने दिलेल्या साथीमुळे यंदा जानेवारी अखेरीस आंब्याची आवक बाजारपेठेत सुरू झाली. टप्प्याटप्प्याने ती वाढत गेली. पहिल्या टप्प्यात दररोज दोन- तीन हजार पेट्या प्रमाणात होणारी आवक दहा हजार पेट्यांपर्यंत पोहोचली आहे.


अक्षय तृतीयेनिमित्त पुणे बाजार समितीमध्ये कोकणातून हापूस आंब्याची झालेली आवक.

## अक्षय तृतीयेसाठी खरेदी सुरू

या वर्षी अक्षय तृतीया १० मे रोजी असली तरी शहर, उपनगरे, पुणे जिल्ह्यांतील तालुके आणि गावांतील फळ विक्रेत्यांकडून आंबा खरेदी सुरू झाली आहे. टप्प्याटप्प्याने १०० ते ५०० पेट्या याप्रमाणात ही खरेदी आहे. घरगुती ग्राहक साधारण अक्षय तृतीयेच्या दोन दिवस आधी खरेदी करतो. सुट्ट्यांचा हंगाम असल्याने मागणी व खरेदीही वाढली आहे. सध्या प्रति डझन ५०० ते ८०० रुपये दर आहे. कोकण हापूसचा हंगामदेखील अंतिम टप्प्यात आला आहे. पंधरा मेपासून अखरेच्या हंगामातील आवक सुरू होऊन मे अखेर हंगाम संपेल असा अंदाज हापूस आंब्याचे अडतदार अरविंद मोरे यांनी व्यक्त केला. यावेळी १० ते २० टक्क्यांनी दरही वाढण्याचा अंदाज आहे.


पणन मंडळाच्या महोत्सवात आलेले ग्राहक.



## छोट्या बॉक्सला मागणी

शहरातील मध्यमवर्गीय कुटुंबांचा लहान आकार पाहून कोकणातून लहान बॉक्समधील आंबा बाजारात पाठविण्याचा ट्रेंड आल्याचे करण जाधव यांनी सांगितले. चार- सहा डझनची पेटी तीन- चार हजार रुपयांना घेण्याऐवजी ६०० ते ८०० रुपयांचा एक ते दीड डझनाचा बॉक्स घेण्याकडे मध्यमवर्गीय कुटुंब प्राधान्य देत आहे. हा बॉक्स हाताळणीलाही सोपा असल्याने मागणी वाढत आहे.

## आवक आणि दर

पुणे बाजार समितीतं रत्नागिरी, सिंधुदुर्ग, देवगड आणि रायगड जिल्ह्यांतून सध्या दररोज अंदाजे १० ते ११ हजार पेटी आवक झाली आहे. मागील आठवड्याच्या तुलनेत ती १० टक्क्यांनी जास्त आहे. तसेच दरांमध्येही १० टक्के वाढ आहे. बाजारात कच्चा मालाच्या चार ते आठ डझनाच्या प्रति पेटीला १००० ते २५०० रुपये दर आहे. तयार मालाला दर्जा आणि आकारानुसार ४०० ते ८०० रुपये प्रति डझन दर आहे.

## पणन मंडळाच्या महोत्सवास प्रतिसाद

राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित आंबा महोत्सवाला दरवर्षी चांगला प्रतिसाद मिळतो. यंदा आत्तापर्यंत एक लाख डझन विक्रीतून सुमारे सात कोटी रुपयांची उलाढाल झाली. महोत्सव आणखी महिनाभर सुरू असणार असून एकूण उलाढाल कोटींच्या आसपास पोचण्याची शक्यता असर पणन मंडळाचे साहायक सरव्यवस्थापक मंगेश यांनी सांगितले.

## कर्नाटक हापूसची आवक वाढली

लोकसभा निवडणूक तसेच अन्य कारण कर्नाटकातून होणारी हापूसची आवक घटली मागील दोन ते तीन दिवसांपासून ती वाढली सध्या दररोज प्रति ४ ते ५ डझनांच्या ७ ते ८ पेटी, तर दोन डझनांच्या २० ते २५ हजार पेट आवक होत आहे. चार ते ५ डझनांच्या मालाच्या पेटीला दर्जा आणि आकारानुसार ते १४०० रुपये दर मिळत असल्याचे या आं प्रमुख व्यापारी रोहन उरसळ यांनी सांगितले. अ आणखी वाढण्याचा अंदाज आहे.

## जूननंतर हंगाम गावरान आंब्याचा

मॉन्सूनच्या आगमनाबरोबरच पुणे जिल्ह्य स्थानिक आंब्याचा हंगाम सुरू होईल असा अंदा आंब्याचे प्रमुख अडतदार तात्या कोंडे यांनी केला. यंदा या आंब्याचेही चांगले उत्पादन मावळ, मुळशी, भोर, वेल्हा या भागांतून प्रामुख आवक असते असे त्यांनी सांगितले.

## आंबा बागायतदारांच्या प्रतिक्रिय



**माझी आंब्याची ५०० झाडे असून दरवर्षी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात सहभाग होतो. या वर्षी हवामानाने साथ दिल्याने उत्पादन गेल्या वर्षीपेक्षा ३० टक्के अधिक आहे. यंदा एक एप्रिल ते सात मे दरम्यान सुमारे दोन हजार डझन आंब्याची विक्री केली. आणखी १०० पेट्यांची विक्री २० मेपर्यंत होईल. या वर्षी ३०० ते ६०० रुपये प्रति डझन दर मिळाला. गेल्या वर्षी उत्पादन कमी असल्याने हाच दर ५०० ते ८०० रुपये होता.**

**योगेश गुरव**
वाघोटण, देवग
९४२१२३८४३



**पणन मंडळाच्या महोत्सवात आतापर्यंत सुमारे साडेचार हजार डझ आंबा विक्री केली. आणखी एक हजार पेटी माल उपलब्ध होण्याची शक्यता आहे. यंदा ३०० ते ७०० रुपये प्रति पेटी आंबा विक्री झाली आहे.**

**विपुल गोणबरे, परचुरी**
संगमेश्वर, जि. रत्नागि
९११९५६२४०

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



# भारतातून अनेक देशांना आंबा निर्यात



देशांच्या तुलनेत विकसित देशांना होणारी आंब्यांची निर्यात ही नेहमी फायदेशीर असते. याचे प्रमुख कारण म्हणजे, सदर बाजारपेठांतून शेतकऱ्यांना मिळणारा दर हा जास्त असतो व सदर बाजारपेठा या शाश्वत असतात. देशातून काही प्रमुख विकसित देशांना आंब्यांची निर्यात होत नव्हती. सदर विकसित देशांना आंब्यांची निर्यात करावयाची झाल्यास त्या देशांच्या मागणीनुसार फायटोसॅनिटरीच्या पूर्ततेसाठी निर्यातीपूर्वी आंब्यांवर काही विशेष प्रक्रिया पद्धतीचा अवलंब करावा लागतो. ज्यामध्ये कृषी पणन मंडळाने देशामध्ये सर्वप्रथमच उभ्या केलेल्या विविध विशेष प्रक्रिया पद्धतींच्या सुविधा ज्यामध्ये वाशी, नवी मुंबई येथील व्हेपर हीट ट्रीटमेंट सुविधा (Vapour Heat Treatment Facility), विकिरण प्रक्रिया सुविधा (Irradiation Treatment Facility) व हॉट वॉटर ट्रीटमेंट सुविधा (Hot Water Treatment Facility) यांचा समावेश आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, न्यूझीलंड, दक्षिण कोरिया, मॉरिशस, मलेशिया, अर्जेंटिना तसेच युरोपियन देशांनादेखील या सुविधांचा वापर करूनच आंब्यांची निर्यात केली जात असते. सदर सुविधांमध्ये आंब्यांची प्रतवारी, प्रीकुलिंग कोल्ड स्टोअरेज, रायपनिंग चेंबर, पॅकहाऊस, तपासणीकरिता अद्ययावत प्रयोगशाळा व विशेष प्रक्रिया पद्धतींसाठीच्या मशिनचा समावेश आहे.

बहुतांश विकसित देश बऱ्याच वर्षांपासून भारतीय आंब्यांच्या आयातीस बंदी घालून होते. तथापि, या सुविधा पणन मंडळांनी उभ्या केल्यानंतर त्या त्या देशांच्या तज्ज्ञांच्या उपस्थितीत त्यावर विविध चाचण्या घेऊन या सुविधांची तपासणी होऊन या सुविधा त्या देशांना आंब्यांच्या निर्यातीसाठी वापरल्या जात आहेत. जपान, न्यूझीलंड, दक्षिण कोरिया, युरोपियन देश या देशांकरिता फळमाशीविरहित आंबा निर्यात करण्यासाठी व्हेपर हीट ट्रीटमेंटची सुविधा पणन मंडळाने उभी केली. त्यानंतर अमेरिकेसारखी जगातील सर्वांत मोठी आंब्याची शाश्वत अशी बाजारपेठ खुली करण्यासाठी आवश्यक असलेले विकिरण सुविधा केंद्र देखील पणन मंडळाने उभे करून आज त्या सुविधेवरून अमेरिकन निरीक्षकाच्या (USDA APHIS Inspector) उपस्थितीमध्ये आंब्यावर विकिरण प्रक्रिया करून आंबा अमेरिकेत निर्यात केला जात आहे. तसेच ऑस्ट्रेलिया देखील २०१७ मध्ये सदर सुविधेवर चाचण्या घेऊन खुला झाला. अर्जेंटिना व मलेशिया हे देश देखील येथून विकिरण प्रक्रिया करून खुले झाले आहेत. युरोपियन देशांना आंबा निर्यात करताना आवश्यक असलेली हॉट वॉटर ट्रीटमेंट सुविधा देखील देशात सर्वप्रथमच कृषी पणन मंडळांनी वाशी येथे उभी करून युरोपियन युनियन येथील तज्ज्ञांच्या तपासणीनंतर सदर २७ देशांकरिता आंब्याची निर्यात या सुविधेवरून प्रथमतः सुरू झाली. आज याचाच परिपाक म्हणून विकसित देशांना भारतातून पर्यायाने राज्यातून मोठ्या प्रमाणात आंब्याची निर्यात केली जात आहे.

**देशाच्या आंबा निर्यातीच्या तुलनेमध्ये महाराष्ट्र राज्याचा सिंहाचा वाटा आहे. निर्यातीमधील सुमारे ७५-८० टक्के आंबा हा राज्यातील असतो. त्यामधून सुमारे ८२ ते ९० टक्के निर्यातमूल्य राज्यातील आंब्याचे असते. यामध्ये प्रामुख्याने राज्यामध्ये उत्पादित होत असलेला हापूस व केसर आंब्याचा मोठा सहभाग आहे. कृषी पणन मंडळामार्फत राज्यामध्ये उभ्या करण्यात आलेल्या पायाभूत सुविधांची या निर्यातीमध्ये महत्त्वाची भूमिका नक्कीच आहे.**

दरवर्षीप्रमाणे यंदा देखील विकिरण सुविधा केंद्रावर अमेरिकेचे निरीक्षक उपस्थित झाले असून, मोठ्या प्रमाणात आंब्यांची निर्यात अमेरिका येथे सुरू झाली आहे.

तसेच, नुकतेच दक्षिण कोरिया येथील निरीक्षकही सदर सुविधेवर उपस्थित झाल्याने दक्षिण कोरियाची आंब्यांची निर्यात सुरू झाली आहे. आंब्यांची निर्यात करीत असताना विकसित देशांच्या मागणीनुसार आंब्यांची गुणवत्ता, ट्रेसिबिलिटी हे देखील या सुविधांवर पूर्णपणे अवलंबल्या जात आहेत. जेणेकरून विकसित देशांमधील ग्राहकांना एक गुणवत्तापूर्ण आणि अत्यंत खात्रीशीर असा आंबा त्या ठिकाणी उपलब्ध होत आहे. गेल्या वर्षी पणन मंडळाच्या सुविधांवरून विकसित देशांना सुमारे ३५०० मे. टन आंबा निर्यात करण्यात आला होता. या वर्षी आत्तापर्यंत सुमारे १००० मे. टनापेक्षा जास्त आंबा निर्यात करण्यात आला आहे.

राज्यामध्ये महाराष्ट्र शासनामार्फत आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित 'महाराष्ट्र ॲग्रिबिझनेस नेटवर्क' (मॅग्नेट) हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. राज्यातील आंब्यांसह १५ प्रमुख फलोत्पादन पिकांच्या मूल्य साखळ्या विकसित करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ करणे, असा मॅग्नेट प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. सदर प्रकल्पामधून आंब्याची गुणवत्ता वाढ, काढणीपश्चात हाताळणी इत्यादीविषयी प्रशिक्षण, नवनवीन तंत्रज्ञाचा वापर, विक्रेते-खरेदीदार संमेलने, विविध प्रदर्शनांमध्ये सहभाग आदीच्या माध्यमातून थेट देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय खरेदीदार कंपन्यांशी जोडणे, काढणीपश्चात हाताळणी, प्रक्रिया आदी सुविधा उभारणीसाठी अर्थसाहाय्य करणे इत्यादी कामकाज करण्यात येत आहे. शेतकरी, त्यांच्या उत्पादक कंपन्या, निर्यातदार आदी घटकांना खेळत्या भांडवलाची व मध्यम मुदत कर्जाची गरज भागविण्यासाठी निवडण्यात आलेल्या वित्तीय संस्थांमार्फत सवलतीच्या व्याजदरात कर्ज देखील उपलब्ध करून दिले जात आहे. तसेच कृषी पणन मंडळाच्या व्हेपर हीट ट्रीटमेंट सुविधा, विकिरण प्रक्रिया सुविधा व हॉट वॉटर ट्रीटमेंट सुविधा मॅग्नेट प्रकल्पाच्या अर्थसाहाय्याने अद्ययावत करण्यात येत आहे. याचा उपयोग राज्यातील आंबा उत्पदकांचा जास्तीत जास्त आंबा निर्यात होण्याकरिता होत आहे.

पणन मंडळाच्या या सुविधांचा सामाईक सुविधा म्हणून वापर होत असून, दरवर्षी सुमारे ५० ते ६० निर्यातदार सदर सुविधांचा वापर करून राज्यातील आंबा उत्पादकांचा आंबा प्रक्रिया करून निर्यात करण्यासाठी वापर केला जात आहे. कृषी पणन मंडळाचा अशा पद्धतीने आंबा निर्यातीमध्ये एक मोठा सहभाग यामध्ये अधोरेखित झाला आहे.

-विनायक कोकरे,
सरव्यवस्थापक, महाराष्ट्र
राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

